# आरति टिळक



# विखुरलेले मोती

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# विखुरलेले मोती

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# विखुरलेले मोती

लेखिका

आरति टिळक

विखुरलेले मोती

लेखिका: आरति टिळक

पत्ता – ११, आशिष सहवास, प्लॉट १८७,

देऊळ वाडी च्या मागे, रविंद्रनाथ टागोर मार्ग

चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०९९

फ़ोन – ९६१ ९२३ ९५३२

ई मेल – tilakarati@gmail.com

निर्मिती सहाय्य- शशांक टिळक

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिके कडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनः मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages, and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.

**प्रकाशन : २३ ऑगस्ट २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## आरति टिळक



B.A., संस्कृत, मराठी

M.A., संस्कृत

(दोन्ही परीक्षा विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण.)

प्रथम वर्ग, प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण - विषेश प्राविण्य

कुलपतींचे पारितोषिक

दहावी मार्गदर्शन ह्या "ABP माझा" कार्यक्रमात सहभाग.

Colors मराठीच्या मेजवानी परिपूर्ण कार्यक्रमात सादरीकरण

बालपणापासून वाचन आवडीच. त्याला पूरक वातावरण आजूबाजूला मिळत गेलं.

व. पु. काळे, रविंद्र पिंगे, शं ना नवरे, मंगला गोडबोले ह्या बरोबरच, मतकरी, माधुरी शानबाग, डॉ. नारळीकर, निरंजन घाटे, यांच्या गूढकथा, विज्ञान कथा वाचनाची आवड.

प्रसंगानुरूप समारंभ, महिला मंडळ, ह्यासाठी लेखन.

उत्तम कथा मधे, "आम्हाला दोन मुलीच" ह्या वरील लेखाला, प्रसिद्धी. वेळोवेळी लिहीलेले लेख, योग्य संस्करणा नंतर एकत्रीत करून इ साहित्य च्या मदतीने आपल्या पुढे सादर करत आहे.

# मनोगत

मी तेव्हा तशी
झाले केव्हा अशी?
पडले काही प्रश्न
प्रश्नच राहून गेले
सोडविता ते कोडे
पुरतीच हरवून बसले
सापडले काही मोती
काही होत्या काचा
पण उगा कशाला वेचू
बोचतील त्या हाता
मोत्यांची केली माळ
उरला आता गाळ
तो कशास साठवू आता
शोधते मी आनंद वाटा.

जीवन, संसार, आयुष्य साधर्म्य असणारे शब्द, आपण वापरतो. पण संसार रेटतो, जीवन जगतो, आयुष्य उपभोगतो.

अस वेगळेपण त्यात अभिप्रेत असतं. वेगवेगळ्या प्रसंगांना आपण सामोरे जातो. असंख्य अनुभवांचं एक गाठोड जमा होत.

सगळेच अनुभव आनंद देणारे असतात अस नाही. पण अनुभव कसाही असला तरी जगण समृद्ध करतो हे नक्की.

लहानपणापासून अनेक नव्या गोष्टी करण्याची आवड. त्यातूनच, फुलं, पक्षी, निसर्ग ह्या विषयाची आवड निर्माण झाली, जोपासली गेली. घराला मोठी गच्ची होती. त्यामुळे झाडं, फुलं ह्याची हौस करता आली. वेगवेगळ्या ठिकाणी रहाणं, फिरणं झाल. त्यातूनही अनेक वेगवेगळे अनुभव मिळाले.

स्वयंपाक ही कधी त्रासाचा वाटला नाही. जरा जास्तच आवडीचा. सुरवातीला तिथेही गंमतीचे प्रसंग घडले.

वाचनाची मुळातच आवड, त्याला पूरक वातावरण मिळत गेल. माझ्या भागात दिवाळी अंकांची लायब्ररी चालवण्याचा उपक्रम ही सुरू झाला, गेली १३ वर्ष ज्याचा लाभ जेष्ठ महिलांनाही होतो.

त्यातूनच, घरगुती समारंभ, महिलांचे कार्यक्रम, ह्या निमित्ताने थोडफार लेखन झाल. आकाशवाणीवरील ललित लेख वाचनाची संधी मिळाली. हे सर्व बोलुनच व्यक्त केले असल्या मुळे, लक्षात रहायला सोपे जावे या द्रुष्टीने भाषेचा फारसा साजश्रृंगार या लेखांमधे केला नाही. तुम्ही हे कुठे पाठवत का नाही तुमचे लेख? अशी विचारणा आप्तांकडून झाली. घरातल्याच जेष्ठांच्या पुस्तक

प्रकाशनाचा अनुभव गाठीशी होता. पण आजकाल तसं फारसं वाचन होत नाही. पुस्तक पडून रहातात, म्हणून कधी पुस्तक काढण्याचा विचार डोक्यात नव्हता. विदेशात आपण इ साहित्याचा आनंद घेतो, तसं काही करता येईल कां? हा विचार मनांत आला.

माझी वाचन प्रेमी मैत्रिण "क्षमा फडणीस" हिच्या प्रोत्साहना शिवाय हे शक्यच नव्हत. तेव्हा तिचे आभार मानावे तेवढे कमीच.

इ साहित्यची साथही तेवढीच महत्वाची. त्यांच्या टीमने दिलेल्या सहकार्यासाठी त्यांचीही मी ऋणी राहीन.

त्याच बरोबर, प्रथम वाचक असलेले माझे कुटुंबीय आणि संगणकीकरण करण्या करिता मला मदत करणारे माझे पती (शशांक टिळक) ह्यांच्या मी ऋणातच राहू इच्छीते.

गेली ४८ वर्ष मी शिक्षण क्षेत्राशी संबंधित आहे.त्यातही बरेच आनंददायी अनुभव आहेत. इथे त्यांचा आंतर्भाव नाही. ते परत कधी तरी. हे वाचतताना ह्या आनंद वाटेवर तुम्हाला जो विरंगुळा मिळेल, तीच मला मिळालेली पोंच.

तूर्तास इथेच थांबते.

**आरति टिळक.**

## **अर्पण पत्रिका**

निरनिराळ्या अनुभवांनी माझे जीवन समृद्ध करणाऱ्या

व

मला प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या सर्व, आप्तस्वकीय,

आणि

मित्र, मैत्रिणींना,

सस्नेह

# आरती देवीची

**ॐ जय जगदीश हरे च्या चाली वर**



मंगल दिन आला, माते, मंगल दिन आला.

ओवाळू आरति (2) अंबा मातेला

ॐ जय जय जगदंबे ||ध्रुव ||

प्रथम दिनी नऊ धान्ये पेरून, घट हा स्थापिला,
माते घट हा स्थापिला

आणूनी पुष्पे पत्री (2) करूया अर्चना ॐ जय जय जगदंबे.||१||

नऊ दिनी नऊ फुलमाला नंदादीप तेवे अंबे नंदादीप तेवे

धूपदीप लावूनी (2)आळवू तुज माते ॐ जय जय जगदंबे ||२||

आला रविकर दारी, घालू तोरण रांगोळी(2)

शोभेफुलमाळांनी अंबा या सदनी ॐ जय जय जगदंबे ||३||

शोभे मौक्तिक माळा कुंडल नथ नाकी (2)

कुंकुम मळवट भाळी शालू अन चोळी ॐ जय जय जगदंबे ||४||

टाळ झांजा घंटी हाती, जागर नामाचा, देवी जागर नामाचा

माझी माता आहे कृपा रूप सरिता. ॐ जय जय जगदंबे ||५||
प्रविणा (आरती टिळक)

# अनुक्रम

१. नर्मदा परिक्रमा ........................................ २
२. निसर्ग अनुभव - परदेशांतील ........................................ २५
३. स्वयंपाक घरांतील गंमती जंमती - १ ........................................ ३२
४. स्वयंपाक घरांतील गंमती जंमती - २ ........................................ ३८
५. कोबी पुराण ........................................ ४२
६. मुक्त चिंतन – १ - दिवाळी ........................................ ४५
७. मुक्त चिंतन - २ - वाढदिवस ........................................ ५०
८. मुक्त चिंतन - ३ - पुस्तक दिन ........................................ ५३
९. मुक्त चिंतन - ४ - राम नवमी ........................................ ५६
१०. मुक्त चिंतन - ५ - माझं आवडते झाड ........................................ ६०
११. प्रवासातील अशाही गंमती जंमती ........................................ ६५
१२. प्रवासातील सुखद: अनुभव - १ सिमला प्रवास ........................................ ७९
१३. प्रवासातील सुखद अनुभव - २ - वसंत बापट ........................................ ८२
१४. प्रवासातील सुखद अनुभव - ३ - यशवंत देव ........................................ ८५
१५. गंमत जंमत (अजून एक किस्सा) नापासाची गंमत ........................................ ८८
१६. सांग दर्पणा ........................................ ९१
१७. अलक ........................................ ९५
१८. लागा चुनरीमें दाग ........................................ ९७
१९. आई ........................................ १०१
२०. तेथे कर माझे जुळती ........................................ १०५

# १.	नर्मदा परिक्रमा

२०१७ साली आम्ही नर्मदा परिक्रमा केली. त्या अगोदर दोन वर्षापासून नर्मदा परिक्रमेचा विचार डोक्यात होता.पण काही ना काही कारणाने ही गोष्ट जमली नाही.

२०१७ साली मात्र जरा धीर करून सर्व नियोजन केले. आणि तीन नोव्हेंबरला निघायचे निश्चित केले. नर्मदा परिक्रमेला जाण्याचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला, तसं हे शिवधनुष्य आपल्याला पेलेल ना? असे वाटू लागले. माझे सासरे डॉक्टर विनायक टिळक यांनी तीस वर्षापूर्वी ही परिक्रमा पायी केली होती त्यामध्ये त्यामागे त्यांचा कोणताही धार्मिक हेतू नव्हता. त्यांच्याकडून थोडीशी माहिती झाली होती.

परंतु त्या वेळेची आणि आताची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती यामध्ये जमीन-अस्मानाचे अंतर पडले होते. मध्यप्रदेश नर्मदा, नर्मदा सरोवर ह्यांच्या ओढीने ही अवघड वाट बसने का होईना आपण पार करावी असे वाटले, आणि आम्ही प्रवासाला निघालो.

एकदा यात्रेकरू झाल्यावर मात्र खरोखरच घर, आपलं काम, कसलेच विचार मनांत आले नाहीत. ४ तारखेला आम्ही उज्जैनला पोचलो. सर्व सहप्रवासी तिथेच भेटले.

इथून मुक्काम ओंकारेश्वर ला होता. 'ओम शिवम' नांवाच्या लॉज मधे रहाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. अगदी फाईव्ह स्टार नसली ना तरी स्वच्छ चादरी, स्वच्छ बाथरुम, आणि मागाल तेव्हा पाच मिनिटात मिळणार गरम पाणी, आणखी काय हवं आपल्याला? खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था कंपनीतर्फे त्यामुळे फारसा प्रश्न आला नाही.

त्यादिवशी ओंकारेश्वर ला आणि ममलेश्वर ला जाऊन दर्शन घेतले गुरुजींनी परिक्रमा आणि दोन्ही देवस्थानांची माहिती सांगितली. गंमत म्हणजे तेव्हा त्रिपुरारी पौर्णिमा असल्याने नर्मदेच्या काठी जत्रा होती. प्रचंड गर्दी, मेळ्यातले स्टॉल्स, अगदी मृत्यू गोल सुद्धा होता. मोठमोठे लाऊडस्पीकर लावून ठेवलेले होते. विचारू नका खूप वर्षांनी अशी जत्रा आणि गर्दी अनुभवली.

देवळात तर एवढी गर्दी होती, बापरे ! आता आपलं पुढले पंधरा दिवस काही खरं नाही, असंच वाटलं. दर पाचव्या मिनिटाला, आपला हरवलेला मुलगा, नाव अमुक-तमुक या ठिकाणी सापडला आहे, त्याला येऊन घेऊन जावे. अशा घोषणा होत होत्या. त्या घोषणा ऐकून 'मनमोहन देसाई' आणि इतर सिनेमा

ॐ कारेश्वर घाट

वाल्यांचा 'मेले मे बिछडे भाई' हा फॉर्म्युला जो अतिशय लोकप्रिय



होता आणि वारंवार वापरला जात असे तो नक्कीच घडला असणार, याची खात्री पटली. लोकांची भक्ती आणि श्रद्धा पाहून तिथेच नतमस्तक होण्याची पाळी आली." श्रद्धा आणि सबुरी" याची आपल्याला फारच गरज आहे हे सुद्धा पटलं.

दुसऱ्या दिवशी नर्मदेच्या घाटावर स्नान करून आणि संकल्पाची पूजा करून परिक्रमेला सुरुवात होणार होती. त्या गर्दी मध्ये अंघोळ म्हणजे शिक्षाच वाटली. मनात आलं, त्या पुराणकालीन "त्रिशंकू' सारखी आपली अवस्था आहे. तो जसा स्वर्ग आणि पृथ्वी या मधे तरंगत राहिला, तशीच आपली गत



कुमारिका पूजन

आहे. सोडवत नाही जुने पूर्णपणे आणि नवीन तर आपण आचरणात आणू शकत नाही. त्याचा पूर्ण स्वीकार करू शकत नाही.

पण गुरुजी फार चांगले होते, म्हणजे आम्ही करू ते चालवून घेणारे असं नव्हे, तर चांगले शिक्षित होते. स्वच्छ उच्चार, चांगले पाठांतर, समाधान करण्याची वृत्ती. ती खूप महत्त्वाची. एवढ्या गर्दीत आम्हा दहा जणांसाठी त्यांनी व्यवस्थित पूजेची तयारी आणली होती. सवाष्णीला साडी चोळी आणि कुमारिका पूजन व्यवस्थित पार पडले. नर्मदेची आरती आणि अष्टक म्हटले, त्या वेळेला माझे गाण्याचे ज्ञान, आवड उपयोगी पडली. कारण अष्टक आणि आरती खूप मोठी होती. पण गुरूजींची चाल आणि मी लावलेली चाल सारखीच निघाली. तुम्ही टाळ खूप छान वाजवता असा शेराही त्यांनी दिला. तो ऐकून आमच्या इथे असलेल्या भजनी बायका तोंडाला पदर लावून हसतील हा भाग वेगळा. 😊 एकंदरच एवढी दक्षिणा घेतली पण गुरुजींनी मनाला मात्र समाधान दिले.

नर्मदा परिक्रमा चातुर्मासा नंतर सुरू करतात. आणि नर्मदेत त्रिपुरारीला "दीपदान" याचेही महत्व असते. शाळेत "दीपविसर्जन" ही कविता शिकलो होतो. ती पक्की डोक्यात होती. गुगलमुळे तिचेही वाचन झाले. आणि "स्थितीचा असे किंकर प्राणीमात्र, स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र" या ओळीचा तेव्हा अभ्यास

आणि मार्कां पुरता समजलेला अर्थ आता अनुभवला असल्याने, अधिकच भावली ती कविता मनाला.

सकाळचे जेवण करून नंतरचा आमचा मुक्काम 'बडवानी' येथे होता. गाव तसं लहान पण स्वच्छ. तेथे जवळपास शासकीय निवासस्थाने होती. पण आमचा मुक्काम रात्री पुरताच होता. दुसऱ्या दिवशी सकाळी तिथून आम्ही निघालो ते अंकलेश्वर ला पोचलो. अंकलेश्वर ला जाताना वाटेमध्ये प्रकाशा म्हणून गाव होते. त्या ठिकाणी शेतकरी मोर्चा ची मोठी तयारी चालली होती. तिथे केदारेश्वर आणि विश्वेश्वराचे मंदिर होते. तसेच शिवमहिम्न स्तोत्र रचणारा पुष्पदंत याच्या नावाचे ही मंदिर होते ते पाहायला मिळाले. म्हणजे त्याने जिथे स्तोत्र रचले ती जागा नर्मदेच्या तीरावर आहे. तिथे धर्मशाळेत जेवण करून आम्ही अंकलेश्वर ला जायला निघालो.

तेथे मात्र हॉटेल अगदी भरवस्तीत होते. स्टेशनही जवळच होते. रेल्वे गाडीचा आवाज ऐकू येत होता. मोठा रस्ता, दुतर्फा दुकाने. पण रस्त्यावर प्रचंड घाण, कचरा. दुकान वाले सुद्धा कचरा टाकत होते, "इधर कोई सफाई करने नही आता" काही विचारलं की हे उत्तर तयार. देशाचे पंतप्रधान जे गुजरातचे मुख्यमंत्री होते तिथे "स्वच्छता अभियानाचे" तीन तेरा वाजलेले पहायला मिळाले.

दुसऱ्या दिवशी "कठपोर" ला जायचे होते. तेथे बोटीचे बुकिंग मिळणे आवश्यक असते. कित्येक साधू, गुरु यांच्या पांच पांच बसेस आलेल्या असतात. ४० ते ५० बोटी ३५० - ४०० लोकांना घेऊन निघतात. आणि बोटीचे निघणे भरती-ओहोटी वर अवलंबून असते. हा परिक्रमेत ला जरा अवघड भाग आहे. पण कठपोरला "विमलेश्वर" म्हणून देऊळ आहे अतिशय सुंदर. सर्व बारा ज्योतिर्लिंगाच्या प्रतिकृती आहेत तिथे. नर्मदा माता, पार्वती माता, गणेश, हनुमान सर्व देव आहेत. परिसरात स्वयंपाकाला जागा, पाणी सर्व काही व्यवस्था आहे. तो दिवस अंगारकी चा होता. म्हणून आम्ही आवर्तने केली. या व्यतिरिक्त रोज नर्मदेची आरती आणि सकाळ आणि संध्याकाळ अष्टक म्हणणे चालूच होते. तसेच वाटेत भेटलेले लोक एकमेकांना "नर्मदे हर" म्हणत, त्यावरून ते परिक्रमावासी आहे हे समजत असे. ती धर्मशाळा ज्याची होती

त्यांनी आम्हालाही "भोजन करेंगे क्या? "फलाहार करो" अशी विनंती केली आणि हे सर्व कशाचीही अपेक्षा न करता.

समुद्रांतून उत्तर तीरा वर जातांना

नर्मदा परिक्रमा मध्ये हा अनुभव खूपदा आला. आम्हाला



संध्याकाळी बोट मिळाल्याने आम्ही “मिठीतलाई” ला मात्र अंधारात पोहोचलो. आमची बस सामाना सकट पुलावरून तेथे आधीच पोचली होती.

आचार्यांनी स्वयंपाक तयार ठेवला होता. मिठीतलाई ला ही धर्मशाळा होती. पाण्याने पूर्ण भरलेली विहीर आणि जोराने वाहणारे नळ यामुळे प्राथमीक स्वच्छता करून आम्ही तेथे उपास सोडला आणि गरुडेश्वर ला प्रयाण केले.

“गरूडेश्वर” ला पोहोचेपर्यंत रात्रीचे दोन वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी जरा आराम होता कारण रात्री खूप उशीर झाला होता. हे हॉटेल म्हणजे शासकीय निवासा सारखे होते. तेथे ट्रेनिंग साठी अथवा सरकारी कामाला येणारे लोक रहात असावे. खूपच प्रशस्त. देखभाली अभावी ते दयनीय वाटत होते अर्थात मोठ्या खोल्या, भरपूर पाणी आणि जागा यामुळे दोन तीन दिवसाचे कपडे धुवून वाळवता आले.

तिथून जवळच दत्तमंदिर टेंबे स्वामींचा मठ आणि सरदार सरोवराचा काही भाग बघितला. नर्मदे चा घाट फारच छान आणि प्रशस्त होता. वासुदेवानंद सरस्वतींच्या स्थानाला भेट देता आली म्हणून आनंद झाला. सरदार सरोवराच्या कालव्यात सुसरी दिसल्या त्या आधी कठपोरला जाताना मुंगूस दिसले. तिकडचे लोक मुंगूस दिसणे हा शुभशकुन म्हणतात. असो. तेथे जेवण करून आम्ही माहेश्वर ला पोहोचलो,



माहेश्वर येथील घाट

माहेश्वर फार छान आहे आजही तो घाट पाहताना विशाल वाटतो. तिथे सहस्त्रार्जुन मंदिर, अहिल्याबाईंची समाधी आहे. त्यांचा वाडा आणि सोन्याचा पाळणा सुद्धा पाहिला. इतरही वापरातल्या गोष्टी पाहता आल्या. मग साडी खरेदीचा कार्यक्रम झाला.कार्डा शिवाय पैसे दिले तर जी.एस्. टी.नाही असे दुकानदार सांगत होते कारण त्यावेळी ते नुकतेच सुरू झाले होते. मला साडी घ्यायची नव्हती म्हणून दोन-तीन दुकानं हिंडून घेतली. शेवटी एका दुकानात स्वस्तात साडी मिळाली म्हणून घेतलीच मी. 😊

तिथून इंदूरला पोहोचलो. सगळे परिक्रमा वाले वयानी आमच्यापेक्षा मोठे तेव्हा इंदूरचे " ५६ दुकान" काही होणार नाही असं वाटलं. पण सगळेच उत्साही. मग स्वयंपाक करणार्यांना सुट्टी दिली. रात्री इंदूरची मिठाई व कचोरी यांचा आस्वाद घेतला. खरं हे परिक्रमेमध्ये बसत नाही. पण परिक्रमा करण्यामागे फारसा धार्मिक दृष्टिकोन नसल्याने चालून गेले. तिथेच अन्नपूर्णा मंदिर, बडा गणपती, शिवमंदिर आणि वेदमंदिर पाहिले.

आता इंदोर हून भोपाळला पोहोचायचे होते. वाटेत “ नेमावर” ला नर्मदा आणि घाटाचे दर्शन होते तिथे सिद्धेश्वराचे मंदिर आहे.

गरुडेश्वर च्या मानाने घाट लहान आहे. भोपाळ गावाच्या बाहेर हॉटेल असल्याने भोपाळमध्ये स्थलदर्शन झाले नाही. तिथून जबलपूर. दुसऱ्या किनाऱ्यावरवरून नर्मदा पाहिली, पण तो घाट मात्र नाही आवडला. घाण, गुरांची वहिवाट, आणि खाऊन टाकलेल्या डिशेस, बाथरूमची ही सोय नाही म्हणून मन थोडं खट्टू झाले.

भोपाळला आमचं जंगी स्वागत झालं. हॉटेलमध्ये आरती ओवाळली. हार घातले गेले. कारण परिक्रमा करणारे ना आम्ही.? एवढे सुंदर हार टाकायला जीव होतो का? मग दुसऱ्या दिवशी

दोघांचेही हार जोडून तो बसला घातला. तिच्यामुळेच हे शक्य होते आहे, तिचाही आदर करावा  असे वाटले.

इथून "अमरकंटक" म्हणजे नर्मदेचे उगमस्थान जवळजवळ २५० किलोमीटर चे अंतर आहे. परंतु रस्ता खूपच चांगला. एकूणच हा प्रदेश भरपूर पाणी भरघोस पीक आणि सुबत्ता असलेला. अंकलेश्वर ला मिरची मोहरीची शेती दिसली तर पुढे जावं तसं ज्वारी मका याची मैलोन मैल पसरलेली शेते होती. शेतामध्ये ट्रॅक्टर, राबणारे लोक आणि भरपूर दूध दुभत. चांगले रस्ते बहुतांश ठिकाणी होते. एवढे गुरांचे कळप की, आपणच गुरांच्या मध्ये जाऊन त्यांना व्यत्यय आणतो की काय असे वाटावे अशी स्थिती होती.

आजही दहा रुपयाला तीन पालकांच्या जुड्या आणि वीस रुपये किलोला भरताची वांगी हे ऐकलं की कानावर विश्वासच बसत नाही. अगदी २० ररुपये किलो पेरू ३० रुपये किलो भरताची वांगी. एवढी समृद्धी आहे आपल्याकडे.

अमरकंटक आपण म्हणतो पण खरं नाव "अमरकंठ" असे आहे आम्ही पोहोचलो तेव्हा अंधार पडू लागला होता दिवस छोटा व्हायला लागला होता ना. इथे रामकृष्ण परमहंस यांच्या नावाने एक धर्मशाळा होती तिथे राहायची सोय होती. धर्मशाळा म्हणायचं पण

रम्य परिसर, स्वच्छता,आणि खोल्या खूप मोठ्या. कपडे वाळवण्याची सोय. कमोड तर प्रत्येक ठिकाणी होता. कारण आपली बदललेली जीवनशैली. स्वयंपाकाला मोठी जागा. मग काय दुसऱ्या दिवशी पुरणपोळीचा बेत होता. सर्व मंडळी या दिवशी खुश होती. या ठिकाणी थोडीशी रपेट होते थोडं वर-खाली, दगडाचा रस्ता आणि माकडं सोबतीला असा सर्व प्रवास असतो.



कपील धारा दुग्धधारा धबधबे

तिथे "कपिलधारा" आणि "दुग्धधारा" असे दोन धबधबे आहेत. छान वाहत पाणी. नर्मदेत सहज पाय बुडवता येतात. कपील मुनींचा आश्रम, शंकराचे देऊळ, आणि दुर्वास मुनी जेथे तप

करायला बसले ती जागा. त्या ठिकाणी त्यांची मूर्तीही आहे. सदा क्रोधाविष्ट होऊन शाप देणाऱ्या त्या मुनींना साक्षात दंडवतच घातला. तिथेच नर्मदेची मूर्ती आहे पण दोन-तीन फूट सरपटत जावे लागते. मी काही तेथे पोचले नाही बाहेरूनच नमस्कार केला. येथे परिक्रमा मोडण्याचा, नियम भंग होण्याचा धोका निर्माण झाला होता. गाईड नवा होता. तो आम्हाला चांगला रस्ता म्हणून पुलावरून घेऊन जात होता. पण आमच्या बस कंडक्टर हुशार होता त्याने लांबूनच ते पाहिले आणि ओरडून रस्त्यावरून जायला सांगितले. तो रस्ता दगड-मतीचा होता. पण वाचलो आम्ही परिक्रमा मोडली जाण्यातून, कारण अर्ध्याहून जास्त प्रवास नियमाप्रमाणे नर्मदामैया ला उजव्या बाजूला ठेवून झाला होता ना.

या भागात आम्ही अगदी वेळेवर म्हणजे सकाळी लवकर पोचलो. कारण नंतर नाशिक होऊन पाच बसेस स्वामीं बरोबर आल्या होत्या ती माणसं यायला लागली. त्यांचा धर्मशाळेत मुक्काम नाही तर अशा नदीवर, घाटावर अंघोळी कपडे धुवून टाकायचे. मग काय विचारता, गर्दी झाली पण परत जाताना कपिलधारे कडे जाणार्यांचा आधार मिळाला. वाट सोपी झाली. खाली जाताना ती जेवढी कठीण वाटली तेवढी कठीण वाटली नाही आता.

तिथून नंतर “जोहिला” म्हणजे नर्मदेची सखी तिचं मंदिर, उगम आणि “जालेश्वर महादेवाची” मोठी मूर्ती पाहिली. अशीच मोठी मूर्ती मुरुडेश्वर येथे पाहिली होती.

हे सर्व दर्शन झाल्यावर आता आराम होता. मग आम्ही जवळच वनखात्याची नर्सरी होती ती पाहायला गेलो. तिथे खूपच प्रकारची झाडे होती. रुद्राक्ष, वेगवेगळया प्रकारचे बांबू, बेल, शतावरी अशी अनेक प्रकारची झाडे होती. त्यात एक गुलबकावलीचे झाड म्हणून त्यांनी दाखवले. ते म्हणजे आपला सोनटक्का. या फुलांचे वाळवून पाण्यात उकळून अर्क काढतात. आणि तो खूप उपयोगी आहे असे कळले.



नर्मदा मंदीर

त्यानंतर संध्याकाळी नर्मदेच्या उगमाशी तिची मूर्ती आहे, ते देऊळ पाहण्यास गेलो. सात वाजता तेथे मोठी आरती असते ही आरती एक तास चालते. पण खूप छान वाटलं ते ऐकताना. वेळ कसा गेला काही कळलं सुद्धा नाही. देवळात अर्ध्या भागा पलीकडे परिक्रमावासी जाऊ शकत नाहीत कारण परिक्रमा मोडते.



नर्मदा उगम गोमुख

दुसऱ्या दिवशी सकाळी खूप लवकर उठून बाटली मधली नर्मदामैया घेऊन आम्ही तट परिवर्तनासाठी निघालो. तेथे एक छोटीशी पूजा असते. इथे कुंडामध्ये परत नर्मदामैया म्हणजे आपले बाटलीतले पाणी अर्पण करून बाटली भरून घ्यायची असते. या ठिकाणी परत आरती झाली नर्मदाष्टकम् म्हटले

आपापल्या इच्छेप्रमाणे दान दिले. तोपर्यंत बस परत धर्मशाळेत जाऊन आमचे सामान, नाश्ता घेऊन दुसऱ्या बाजूला येऊन उभी होती.

तिथून निघून एका घराच्या ओसरीवर आमचा नाश्ता झाला. इथे जरा गंमत झाली. त्या माणसाची गाय रात्रभर रुसून एका झाडाखाली जाऊन बसली होती. काही केल्या ती गोठ्यामध्ये येत नव्हती. ती कधी परत येईल या विवंचनेने मध्ये तो घर मालक होता. एक एक गंमतच आहे ऐकाव ते नवलच. ही गाई, गुरं सुद्धा घरच्या सभासदां सारखे असतात यांना. आता तट परिवर्तन झाले त्यामुळे पुढची यात्रा सोपी होती, तुलना करता.

इथून जवळ जवळ तीनशे किलोमीटरचा प्रवास करून आम्ही नरसिंगपूर ला आलो. राहायची व्यवस्था चांगली होती. पण गाव तसं छोटं आपल्या उपयोग पेक्षा प्लंबिंगच होलसेल सामान विकणारी दुकानं जास्त दिसली त्या ठिकाणी. पण नृसिंहाचं दुर्मिळ असं देऊळ पाहायला मिळाले तिथे. आता यात्रा जवळ जवळ पूर्ण होते.

इथून नंतरचा मुक्काम हुशंगाबाद ला होता. हे हॉटेल मात्र अजिबात चांगलं नव्हतं. काम चालू होतं. दुसरा मजला, लीफ्ट नाही, आणि भर वस्तीत हॉटेल. या यात्रा व्यवस्थापक, स्वयंपाक

करणारे, मदतनीस लोकांची पण दया येऊ लागली. आपण नाही उचललं तरीही या लोकांना एका रात्रीसाठी दोन दोन मजले, आमच्या सामना बरोबरीन जेवणाचं सामान वर घेऊन यावं लागतं. चेष्टा नाही.

तिथून थोड्या अंतरावर हर्दा येथे एक बरं हॉटेल होतं पण असो. आता परत ओंकारेश्वर पोहोचायचं होतं परंतु २०० किलोमीटर आंतर त्यामुळे सकाळी लवकरच निघालो. फक्त चहा घेतला. वाटेत नाश्ता. कमाल म्हणजे एवढ्या सकाळी समोसे करून घेतले होते सर्वांसाठी. वाटेत थांबून दुपारी एका घराच्या पडवीत जेवण झाले.

कणिक भिजवलेली. बरोबर तयार दोन भाज्या. मग गरम भात करायचा,आणि पोळ्या. एकाने सॅलड कापायचं आणि ताक घुसळायच. एका तासात जेवण तयार होई.

पुरणपोळी, इम्रती, जिलेबी, हलवा, खीर, शिकरण, शिरा अशी पक्वान्ने पंधरा दिवसात खाऊन झाली. पोहे, उपमा, बटाटे वडे, असा वेगवेगळा नाश्ता. खूप करतात, पण आता आपले सगळे आयाम बदलले आहेत, त्याला कोण काय करणार? असो.

ओंकारेश्वरला पोचल्यावर दुपारी परत "ओम शिवम" होतच स्वागताला. आता ओंकारेश्वर शांत आणि स्वच्छ वाटलं. जत्रेची

गर्दी नव्हती. त्या शांततेत जवळच असलेलं गजानन महाराजांचे मंदिर अजूनच लक्ष वेधून घेत होतं. अतिशय स्वच्छ आणि रम्य परिसर. दुपारी परत घाटावर आंघोळ झाली. यावेळेपर्यंत आता घाटावर अंघोळ करण्याची थोडी सवय झाली होती आणि गर्दी पण कमी होती.

आता ज्या वस्त्रावर आपण पहिली पूजा केलेली असते तीच वस्त्र पूजा करतांना घालायची, मग अंघोळ करून ती वस्त्रे नर्मदामैया ला अर्पण करायची असतात. आणि नंतर दुसरी वस्त्र नेसून पूजा करायची असा तिथे रिवाज आहे.




परिक्रमा सांगता पूजा

परत पहिले गुरुजी होतेच. पहिल्यासारखीच त्यांनी तशी छान तयारी करून आणली होती. एक संकल्प पूर्तीची पूजा घाटावर होते आणि दुसरी पापनाशक पूजा जी पूर्वजांसाठी असते ती ममलेश्वरला होते. रुद्र म्हणतात. गुरुजींचे छान लयबद्ध,आणि स्पष्ट उच्चार होते. खरच प्रसन्न वाटलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी परिक्रमा पूर्ण झाली म्हणून ओंकारेश्वर ला जाऊन नर्मदेचं पाणी वहायाचं असतं आता सर्व पूर्ण झालं, मनाप्रमाणे यात्रा झाली म्हणून सगळेजणच खूष होते. मग थोडा इकडे तिकडे वेळ घालवायला संधी होती कारण आता गर्दी नव्हती. मग दुसऱ्या बाजूची १, २ देवळं, वरून दिसणारा नर्मदेचा परिसर, तिथे असणारा वीज केंद्र पाहिलं. हे सर्व होईपर्यंत टूर मॅनेजर आम्हाला शोधत आला होता. कारण आता ओंकारेश्वराचा निरोप घेण्याची वेळ आली होती.

आम्हाला इंदूर कडे प्रस्थान करावयाचे होते. तिथून सगळयांच्या वेगवेगळया ठिकाणी जाणाऱ्या गाड्या होत्या. वेगवेगळया ठिकाणी म्हणजे पुण्या आणि मुंबईकडे.

मग सगळयांचा नाश्ता झाला. सेवक वर्गाचे आभार मानले, आणि बरोबर पॅक जेवण घेऊन आम्ही पुढे निघालो. बसमध्ये अर्थातच एकमेकांचे पत्ते फोन नंबर यांची देवाण-घेवाण झाली.

“दोन ओंडक्यांची होते सागरात भेट जोडी दोघा पुन्हा नाही भेट"  हे जरी खरं असलं तरी एकमेकांच्या आधाराने काढलेले हे पंधरा दिवस विसरणं कठीणच. कोणाची स्तोत्रपठणाची आवड, कोणाचा संस्कृतचा व्यासंग, कोणी शिवणात पारंगत, तर कोणी असीम श्रद्धाळू आणि अतिशय भक्तीने यात्रेला आलेल्या. नवऱ्याचे ब्रेन चे ऑपरेशन झाले होते तरी त्याला घेऊन आलेल्या आणि त्याचं तंत्र सांभाळणाऱ्या ताई. अनेकविध माणसे भेटली एकमेकांशी सूर जुळले आणि खूप काही शिकायला मिळाले. पापनाश व्हायला यमुने मध्ये तीन वेळा, गंगेमध्ये एक वेळा, स्नान करतात, पण नर्मदेच्या नुसत्या दर्शनानेच पापे धुतली जातात अशी भाविकांची श्रद्धा आहे. गंगेला शंकराने डोक्यावर धारण केले. ती त्याची दुसरी पत्नी म्हणून जरा जास्तच डोक्यावर बसली, नर्मदा त्याच्या घामापासून निर्माण झाली. नरा पासून निर्माण झालेली मादी ती नर्मदा. त्याची, शंकराची मुलगी मानली जाते. शोणभद्राशी तीचे लग्न ठरले होते. तो कसा आहे हे पाहायला तिने “जोहिला” या आपल्या दासीला पाठवले. ती राजकन्येच्या वेषांत गेली. शोणभद्राला तीच नर्मदा वाटली आणि तो तिच्या प्रेमात पडला. म्हणून नर्मदा त्याच्याकडे पाठ फिरवून पश्चिमाभिमुख झाली अशी एक कथा आहे. तट परीवर्तनानंतर एक कुंड आणि गोमुखातून येणारा नर्मदेचा उगम पाहायला मिळतो. संपूर्ण मध्य प्रदेशाला

सुजलाम सुफलाम करणारी ही जीवनदायी आहे. दोन्ही तट मिळून हजारो मंदिरे आणि तीर्थस्थाने आहेत. मार्कंडेय मुनींनी पण ही परिक्रमा केली आणि त्यातूनच नर्मदा पुराणाची निर्मिती झाली. परिक्रमा होते अशी ही एकच नदी आहे. ऋषीमुनींच्या वास्तव्याने पावन झालेला हा भूभाग. यात्रेच्या शेवटी अगदी कितीही धार्मिक भावना ही यात्रा करताना नाही असे पण म्हटलं ना, तरी आपल्यातील अष्टभाव जागृत करण्याचं सामर्थ्य आहे या परिक्रमेमध्ये. नर्मदे हर. हर म्हणजे सर्व दुःखाचे हरण करणारी असाही त्याचा अर्थ आहे.

माणसाला कशात सुख आहे हे कसं आणि कोण ठरवणार? गेल्या तीस वर्षात अनेक आंदोलने झाली. नर्मदेवर अनेक धरणे झाली. "शूलपाणेश्वर मंदिर"आणि पुर्वीच्या परिक्रमेचा कितीतरी भाग धरणाखाली गेला. अनेकांच्या जमिनी गेल्या. शूलपाणेश्वराला जागा मिळाली तशी सर्व शेतकऱ्यांना ही भूमी मिळावी अथवा मिळाली असावी, अशी इच्छा करू शकतो. पण सरदार सरोवरामुळे, मध्यप्रदेश, गुजरात चा भाग शेती दृष्ट्या अधिक समृद्ध झाला आहे हे मात्र नक्की.

पायी परिक्रमा करण्याचा पराक्रम आज मी करू शकत नाही. पण एवढे तरी फिरण्याची ताकद, जुळवून घेण्याची क्षमता ज्यांनी

दिली ना, त्या परमेश्वर रूपी शक्तीचे आणि नर्मदामैया चे शतशः आभार.

माझा या नर्मदा परिक्रमा वृत्तांताचा शेवट मी बस मध्ये केलेल्या एका छोट्याशा पद्य पंक्तींनी करते.

नर्मदा परिक्रमेला निघाली अनोळखी मंडळी सारी
पंधरा दिवसात नर्मदेत वाहून गेली त्यांच्यातली दूरी

अवघड झाली आहे भेट नातलग, सुहृदांची परी
करती सारे आशा, एकमेकांना भेटण्याची वरचेवरी

असुदे नर्मदामय्याची कृपा सर्वांवरी
असेच आनंदी उत्साही राहू या संसारी.

# २.    निसर्ग अनुभव - परदेशांतील



परदेश प्रवासाचा आकर्षण कुणाला नसतं? नवनवे देश, प्रेक्षणीय स्थळे पाहण्यात खरंच फार मोठा आनंद असतो.

पण अमेरिकेला जेव्हा मी पहिल्यांदा जाऊन आले, त्यानंतर मला असं वाटलं की प्रेक्षणीय स्थळ जाऊदे, पण इथला प्रत्येक ऋतू बरोबर बदलणारा निसर्ग पाहिला मिळाला पाहिजे. आणि खरच माझी इच्छा पूर्ण झाली.

१९९२ साली जेव्हा प्रथम मी तिथे गेले तेव्हा नुकताच



तिकडचा उन्हाळा संपायला आला होता. त्या ठिकाणी फॉल सिझन जवळ येत होता. आणि म्हणून झाडांच्या बरोबर इतर रंगाच्या छटा दिसू लागल्या होत्या. काही मेपल झाड तर गुलाबी गुलाबी दिसत होती. हळूहळू जमिनीवर पानांचे थर जमा होत होते.थोड्या दिवसात पुढच्या थंडीची चाहूल देणारा

भुरभुरणारा बर्फ पाहून चित्तवृत्ती हरखून जात होती. पण त्यानंतरचा विंटर सीझन अनुभवण्याचा योग बऱ्याच कालावधीनंतर आला.



मोठी मुलगी डॉक्टरेट करण्यासाठी अमेरिकेला गेल्यावर तिची "जॉन्स हॉपकीन्स" युनिव्हर्सिटी पाहण्यासाठी म्हणून मी तिकडे गेले. ऐन डिसेंबर मध्ये.

आता मात्र झाडांचे खराटे झाले होते. चुकून सुद्धा एकही पान झाडावर दिसत नव्हते आणि पूर्ण झाड, त्याच्या फांद्या बर्फानी आच्छादल्या होत्या. घरांच्या छतांवर सर्वदूर बर्फाचा थर  जमा झालेला दिसत होता. सर्व निसर्ग जणू काही स्तब्ध झाल्यासारखा वाटत होता. आता यामधून नवजीवन बहरणार तरी कसं? असा प्रश्न मनात उभा राहत होता.



हळूहळू करत जानेवारी महिना संपत आला आणि निसर्ग दमून गेल्यासारखा थोडा थोडा काळ विसावा घेऊ लागला. लगेचच त्या भुरभुरणार-या बर्फाचे बर्फाच्या लादीत रूपांतर होऊ लागले. तरीही सुसज्ज यंत्रणेमुळे फुटपाथ जाण्यासाठी मोकळे केले जाऊ लागले.

आणि हा बाजूला सारलेला बर्फ पाहून गंमतच वाटू लागली. जणू त्याला ही शिस्त मोडण्याची मुभा नव्हती. त्यामुळे अगदी बर्फाचे पाणी झाले तरी निमूट दिलेल्या वाटेनेच ते पाझरू लागे. कुठे त्याचा चिखल नाही की पाणी तुंबून राहणे नाही.

हे सर्व होता होता आता बर्फ पडायचे थांबले. आणि झाडांवर घरांच्या छपरांवर जमा झालेले बर्फ हळूहळू करत दृष्टिआड होऊ लागले. रस्त्यावरची घरांच्या समोरच्या अंगणातली लोकांची लगबग वाढली. स्टोअर च्या बाहेर मोठी मोठी पोती दिसू लागली. त्यामध्ये बागेमध्ये टाकायचा भुसा भरलेला होता.



एक दिवस फिरताना झाडावर "कार्डिनल" पक्ष्यांची जोडी दिसली आणि मग मात्र ते लालचुटुक रंगाचे चिमणीच्या थोडे मोठे पक्षी पाहून खात्री पटली की आता थंडी संपली. आणि वसंत ऋतुच्या आगमनाची वेळ आहे.

आता इतरही पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येऊ लागला झाडावर कुठेतरी दोन चार हिरवी पाने दिसू लागली. जमिनीतूनही हिरवे हिरवे कोंब बाहेर पडताना दिसू लागले. पाहता पाहता त्यांचे हिरव्या रोपट्यात रुपांतर कधी झाले, कळलेच नाही.

लोकांच्या बाग कामाने वेग घेतलेला दिसत होता. हॉटेलच्या समोर रस्त्यांच्या कडेने रोपांची मांडणी होताना दिसू लागली, आणि अचानक एक दिवस सुडोनारसीसच्या (Psuedo Narsissus) फुलांनी बहरलेली रोपे दिसू लागली. जणू पुढच्या पुष्पोत्सवाची ती सलामीची होती.



दररोज आपोआप आलेली आणि मुद्दाम मशागत करून आलेली ही फुलझाडे पाहून मन हरखून जात होतं.केवढी ती रंगांची विविधता? वर्डस्वर्थच्या डॅफोडिल्स् कवितेत वर्णन वाचले होते. वाऱ्याच्या झुळकीबरोबर हलणारी ती फुलं पाहून परत एकदा ती कविता, शाळा, आणि ताव मारून लिहिलेल्या त्या कवितेच्या रसग्रहणाची आठवण झाली. वाटलं आता असा कवितेचा आस्वाद घ्यायला वेळ आहे का कोणाकडे?

पण पुढे दिसणारी फॉक्स ग्लोव्ह, बटरफ्लाय, डायंथस आणि लूथ बरबँक ने निर्माण केलेली "सास्तेडेझी" ची फुले पाहून मनातले असे विचार दूर पळून जात.

एक तर झाड फुलायचं तेच पिवळ्या पानांनी. दुरून पाहताना ती छोटी छोटी पिवळी फुलं आहेत असं वाटायचं. आणि पाहता

पाहता पूर्ण झाड हिरव कधी होऊन जायचं कळत नसे. अगदी गुलमोहोराच्या झाडाची आठवण. मात्र हे झाड म्हणजे छोटं होतं. एक "ब्लिडिंग हार्ट" नांवाचें झाड दिसायचे. छान प्रकार दिसला. त्या झाडाची फुलं बरेचदा



लालसर रंगाची आणि खाली झुकलेली एकमेकांच्या जवळ जवळ असतात. दुरून पाहताना जणूकाही रक्ताचा थेंब असावा असे वाटते आणि या झाडाच्या नावाची यथार्थता पटते.

लिलीच्या फुलांचे अनंत रंग आणि प्रकार दिसले. सरून गेलेल्या बर्फाची आठवण करून देणारी "स्नो इन समर" ची बागेच्या कडेकडेने वाढलेली झाड. तर कुठे रंगीबेरंगी "लुपिन्स". या पाठोपाठ अगदी घरा पुढल्या बागेमध्ये वेगवेगळया रंगांची अगदी काश्मिरी गुलाबाशी स्पर्धाच असणारी गुलाबाची झाड. एका वेळेला शंभर तरी कळया आल्या असतील एकेका झाडाला. उमलल्यावर तर त्या भाराने झाडे वाकूनच जायची. आणि एकदम कालिदासांनी केलेल्या शकुंतलेच्या वर्णनाची आठवण यायची.

हळूहळू बागेतल्या फुलांबरोबर लहान मुलांची वर्दळ वाढू लागली. आणि संध्याकाळी फुलांसमवेत मुलांनीही बागांचा कब्जा घेतला.

इतके दिवस बर्फामुळे फारसा मोकळेपणा न मिळालेली मुलं बागेत बागडताना दिसू लागली.





युरोपमध्ये प्रसिद्ध असलेलं आणि "सिलसिला" सिनेमामुळे सामान्यांनाही परिचित झालेलं "कोकन हॉफ" (Keukenhof) येथे जाण्याची संधी मला मिळाली. ते सौंदर्य अवर्णनीय. पण तिथे देखणी झाडं, फुलं आणि दिसणारी रंगसंगती यात निसर्गाबरोबर कुठेतरी मानवी हातही सामील आहे हे जाणवत रहातं ते बघताना.

आपल्या भारतातही निसर्गाची अशी मुक्त उधळण आहे नाही का ?

हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत प्रत्येक प्रांतात हवामानानुसार वेगवेगळी झाडं आणि असंख्य वेगवेगळ्या प्रकारची फुलं. "व्हॅली ऑफ फ्लॉवर्स" वर्णनही असेच थक्क करणारे आहे. पाहूया आता तिथे जाण्याचा योग कधी जुळून येतो ते.

# ३.    स्वयंपाक घरांतील गंमती जंमती - १

## ४.    चकली

स्वयंपाक घर आणि स्त्रीयांचं अतूट नातं आहे जेव्हा मुलगी स्वयंपाक घरात प्रथमच स्वतःच्या जबाबदारीवर काही पदार्थ पाककृती करायला लागते तेव्हा अनेक गमतीजमती घडतात.

अशीच एक गंमत.

सगळ्यांची आई असते ना तशी माझी आई पण सुगरण. माझं लग्न झाल्यानंतर तिने जे काही सर्व सणवार केले, सासरचे आणि जावई यांचे कौतुक केलं, ती जे काही पदार्थ पाठवत असे किंवा सणावाराच्या निमित्तानी करत असे त्यामुळे सुगरण म्हणून तिचे सर्वजण कौतुक करत असत तिची चकली म्हणजे तर अप्रतिमच. लग्न झाल्यानंतर दुसऱ्या वर्षी जेव्हा दिवाळी जवळ आली तेव्हा माझा धाकटा दीर, त्यावेळी तो शाळकरी मुलगा होता. तो म्हणाला, "यावर्षी ना आपण फक्त चिवडा आणि चकली हे दोनच पदार्थ करायचे बाकी आपण फराळाचं काही करायचं नाही ".

सासुबाई म्हणाल्या की चकली हा पदार्थ माझा काही चांगला होत नाही नेहमी बिघडतात.

तेव्हा तू करणार असलीस चकल्या तर ठीक.

माझा दीर म्हणाला "वहिनी काही घाबरू नकोस मी आहे ना तुला मदत करायला."

मी म्हटलं "तू काय मदत करणार?"

तर म्हणाला "तुझी चकली बिघडली ना तर त्या संपवायला मी नक्की मदत करीन."

झालं भरपूर चकल्या करायचे ठरले,

सासूबाई म्हणाल्या "आपल्याला निदान दोन किलो ची तरी भाजणी हवी कारण आपल्याकडे येणं-जाणं, देणंघेणं आणि एवढे दहा माणसांच घर, आपल्याला काही अर्धा किलो, एक किलो च्या चकल्या पुरणार नाही"

हे ऐकल्यानंतर माझ्या पोटात गोळाच आला. नाही कसं म्हणायचं. घरी हे सर्व पदार्थ केले जात असत. पण लहान असल्यामुळे मी स्वतःच्या जबाबदारीवर कधी हे करून बघितलेलं नव्हत. तरीसुद्धा मी तयारी दर्शवली. आपण खरं तर वसुबारसेला करंजी करतो पण सासुबाई म्हणाल्या "नको आपण वसुबारसेला चकल्या करू. कारण आधीपासून केल्या तर नरकचतुर्दशीच्या

दिवशी अर्धा डबा खाली गेलेला असेल." वसुबारसेच्या दिवसाला सकाळी पहिलं सगळ आवरल्यानंतर मी चकलीच्या भाजणीची उकड काढली. आता एवढी मोठी उकड काढायची, पहिलीच वेळ होती.

सासुबाई आंघोळीला गेलेल्या होत्या आणि आईने सांगितल्याप्रमाणे सगळं मोजून-मापून घालायच्या तयारीमध्ये मी होते. तेव्हा मध्ये बेल वाजली आणि सासुबाई आंघोळीला गेलेल्या असल्यामुळे मी दार उघडायला गेले. आता त्यामुळे माझ दुर्लक्ष झालं की खरोखरच मी चुकले होते कळलं नाही आणि त्यामुळे पुढचा प्रसंग घडला.

सकाळची जेवण वगैरे उरकून आता चकल्या करायला घेऊ असा मी विचार केला. सासुबाई म्हणाल्या मी तुला एक एक गोळा मळून देते त्या नंतरच तू कर. कारण त्यांना पाठीचं दुखणं असल्यामुळे इतका वेळ उभं राहून काही करणं शक्य होत नसे.

आमच्या त्या घरी स्वयंपाक घर तर मोठं होतंच पण त्या मधे मोठाच्या मोठा लांबरुंद ओटा होता. एवढा रुंद होता की शेगडी लांब ठेवली ना तरीसुद्धा ओट्यावर जागा उरायची. त्या म्हणाल्या तू असं कर की त्या ओट्या वर चढून बस म्हणजे तुझे पाय दुखायला नको.

मी तळणी टाकली. आणि चकल्या करायला सुरुवात केली. तळणी तापली असं वाटून मी दोन-तीन चकल्या तेलात मध्ये सोडल्या,आणि बघते तर काय जसे अनरसे हसतात, फसतात ना तशा या चकल्या तेलात विरघळायला लागल्या. एकदम घाबरून गेले. आणि त्या काढून घेतल्या. मग असं वाटलं की आता तेल तापल नसेल म्हणून थोडावेळ थांबले आणि परत एक चकली टाकली. तीही विरघळली. नक्की काहीतरी गडबड आहे असे वाटून मी गॅस बंद केला आणि पटकन ओट्यावरून खाली उडी मारली.

डाळीच्या पिठाचा डबा शोधावा असा विचार केला.

शोधण्याचा आवाज ऐकून त्या म्हणाल्या "काय गं काय झालं खाली का उतरलीस?"

त्यांचा आवाज ऐकला आणि माझं सगळं अवसान गळून पडलं. कोणाला कळू न देता चकली सुधारण्याचा बेतही बारगळला.

मी म्हटलं   “अहो चकली तेलात विरघळते आहे.”

हे ऐकल्याबरोबर त्या उठून स्वयंपाक घरात आल्या. मग आम्ही एका भाजणीच्या गोळयांमध्ये थोडे डाळीचे पीठ घातलं आणि मळून चकल्या बरोबर होत आहेत ना हे बघितलं. आता चकलीच्या दुरुस्तीचे प्रमाण लक्षात आलेलं होतं. जीव भांड्यात पडला त्यानंतर तेलात टाकलेली चकली वर आली ना की आपण पहिल्यांदी पाण्यात पोहायला लागल्यानंतर उडी मारल्यावर, वर आलो की आपल्याला आनंद होतो तसा आनंद मला झाला.



दुपारी साडेबाराला चकली करायला सुरुवात केली ते सगळं पर्यंत संध्याकाळचे सहा वाजून गेले.

त्यानंतर बरीच वर्ष वसुबारसेच्या दिवशी पूजा करताना या घटनेची आठवण काढून सासुबाई आणि मी हसत असू.आता मला काही आईसारखी चकली करायला जमली नाही ही सगळ्या

कॉलनीत कळणार याचं माला मनामध्ये खूप वाईट वाटत होतं. पण आताच्या सारखी दार लावून आपल्या आपलं राहण्याची पद्धत नव्हती. त्यातच कॉलनी ची पहिली सून त्यामुळे प्रत्येक बाबतीमध्ये कुतूहल आणि पाल्यांचा संबंध. मग काय विचारता. असं जरी असलं तरी वयाच्या बाविसाव्या वर्षी आलेला हा अनुभव मला खूप काही शिकवून गेला एवढं मात्र नक्की.

सासूबाईंना मात्र त्यांच्या बिघडणार्या चकलीची पाककृती मी अजूनही विचारलेली नाही. 😊

# ५.	स्वयंपाक घरांतील गंमती जंमती - २

## ६.	सोनू शिवसागर बासुंदी

साधारण १९८५ साल असेल.आता जिथे राहते ना तिथे राहायला येण्यापूर्वी पार्ल्यामध्ये एक वर्ष भाड्याने राहत होते. धाकटी मुलगी दोन वर्षाची आणि मोठी मुलगी सहा वर्षांची होती.

नुसतं घरी बसून काय करायचं म्हणून ट्यूशन घ्यायला सुरुवात केली. अशीच एका सुखवस्तू घरातली मुलगी माझ्या मोठ्या मुलीच्या वयाची असेल, माझ्याकडे ट्यूशन ला येत असे. (आज ती मुलगी डॉक्टर झाली आहे.)

त्यादिवशी तिला अभ्यास करायचा नव्हता, तिला अभ्यासासाठी तयार करता करता, मी पण अगदी थकून गेले. काही केल्या ती होम वर्क करतच नव्हती

शाळा सकाळची असल्यामुळे मी दुपारच्या वेळी सेंटर वरून दूध आणून ठेवत असे. दुधाच सेंटर माझ्यासमोरच होत. त्या दिवशी सुद्धा मी नेहमीप्रमाणे दूध घेऊन आले. पण ह्या ट्यूशनच्या गडबडीमध्ये दूध फ्रिज मध्ये टाकायचं राहिले.

शिकवणी संपल्यानंतर जेव्हा मी स्वयंपाक घरात गेले, तेव्हा मला दुधाची पिशवी बाहेर दिसली. आता दूध तापवून

ठेवण्याशिवाय गत्यंतरच नाही असा विचार मनात आला. म्हणून मी गॅसवर दूध तापवायला ठेवले.

त्या दिवशी, रोज रात्री साडे दहा अकरा वाजता घरी येणारे माझे मिस्टर कसं माहिती नाही पण साडे पाच वाजताच घरी आले. आता हा आनंद कसा साजरा करायचा? असा विचार करत असताना "शिवसागर" मध्ये पावभाजी खायला जाण्याचे ठरले. कारण त्या काळात शिवसागर ची पावभाजी खूपच प्रसिद्ध होती. जर उशिरा गेलं तर तिथे थांबून राहावं लागतं म्हणून सहा वाजता निघायचं ठरल .

ठरल्याप्रमाणे आम्ही शिवसागर मध्ये गेलो. पाव भाजी खाल्ली. मग आता फालूदा घ्यायचा राहीला होता. काय माहिती फालुदा येण्यासाठी खूप वेळ लागला. आपल्याला नेहमीच घाई असते. वेळ लागतो आहे हे पाहून मिस्टर म्हणाले, शिवसागर वाले काय फालुद्याची ऑर्डर दिली की दूध आणायला जातात की काय?



हे वाक्य ऐकलं आणि मी घाबरले. माझा चेहरा बघून यांनी विचारलं काय झालं? मी म्हटलं - दुधाचा गॅस ना मी तसाच चालू ठेवून आले आहे आता काय

करायचं? एवढ्यात फालूदा आला मुलींचा फालुदा खाऊन होईपर्यंत माझ्या डोक्यात अनंत विचार आले.

आता आपल्या घरासमोर आगीचा बंब आला असेल. बिल्डिंग च्या भोवती लोकांची गर्दी जमा झाली असेल.

नाहीतर दूध उतू जाऊन गॅस विझून सगळा गॅस घरात भरून राहिला असेल एक नाही तर दोन. खरं तर आम्ही जाताना चालत घरी जाण्याचे ठरवलेलं होतं. पण आता रिक्षा शिवाय काही पर्याय नव्हता.

रिक्षा प्रार्थना समाज पर्यंत आली. त्या ठिकाणी काही आगीच्या बंबाचा आवाज वगैरे ऐकू येत नव्हता. घराच्या जवळ आलो तर त्याठिकाणी लोकांची गर्दी ही दिसली नाही मी घाईघाईने वर गेले. दार उघडलं आणि एक मिनिट उभी राहिले. गॅसचा वास आला नाही.

मग स्वयंपाक घरात गेले स्वयंपाक घरात जाऊन बघितलं तर म्हणत गॅसवर दूध उकळत होतं आमच्या नशिबानी ते खाली लागलं ही नव्हतं. त्यामुळे दूध लागल्याचेही वास येत नव्हता. पटकन गॅस बंद केला. आणि म्हटलं, चलाबाई, नाही तर बिल्डींग मधले लोक म्हणायचे हे नवीन आलेले लोक काही गोष्टी करून ठेवतात. वाचले त्यातून. फालुदा आज खाऊन झाला होता.

दुसऱ्या दिवशी मस्त बासुंदी. त्यानंतर कधी बासुंदी केली ना ती आम्हाला या प्रसंगाची आठवण यायची आणि तिचं नाव आम्ही "सोनू शिवसागर बासुंदी" असं ठेवलं होतं कारण त्या मुलीला लाडाने सोनू म्हणत असत.

# ७. कोबी पुराण



उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले की सर्व बायकांना सतावणारी सामायिक समस्या. म्हणजे मुलांना कसं आणि कुठे गुंतवून ठेवायचं?आणि भाजी काय करायची? खरं तर हा वर्षभराचाच कोड्यात टाकणारा प्रश्न.

पण उन्हाळयात भाज्यांचे गगनाला भिडणारे भाव, पाहुण्यांची असणारी ये जा, आणि आवडीच्या भाज्यांची कमी झालेली आवक. त्यामुळे हा जिव्हाळयाचा प्रश्न अक्राळविक्राळ रूप धारण करताना दिसतो.

हल्ली बऱ्याच भाज्या मिळतात वर्षभर तरी ही हिरवीगार टवटवीत कोबी च्या भावात फार चढ-उतार होताना दिसत नाही.

असं असलं तरी ही भाजी फारशी आवडणारी नाही. “अग कोबीची काय मटार घालून नाहीतर बटाटा घालून एकच एक

प्रकारची भाजी करायची", अगदी कंटाळा येतो बाई. हा संवाद मैत्रिणी जमल्या की नेहमीचाच. पण असं म्हटलं की मला मात्र या भाजीवर अन्याय करतो आहोत असं वाटतं. घरात एखादा कोबीचा गड्डा आणून ठेवला ना की अगदी हायसं वाटतं मला. इतर भाज्यांच्या मानाने तो फ्रिजमध्ये खूप दिवस टिकतो.

कोबी; भाजी बरोबरच कोशिंबिरीसाठी पण वापरता येतो. हल्लीच्या पद्धतीची लांब चिरून सॅलड म्हणून म्हणून वापरली जाणारी कोबी, आणि किसून, लिंबू पिळून घालून केलेली कोशिंबीर पानाची शोभा वाढवते पण. प्रकृतीलाही किती उपकारक! कोबी घालून केलेल्या फ्राईड राईस छानच लागतो नाही का?

कुणी आयत्यावेळी येणार म्हटलं की कुठे वेळ असतो हातात? मग पटकन कोबी चिरून त्यात डाळीचे पीठ घालून कुकरला लावलं की मस्त कोबीच्या वड्या तयार होतात. पानाला शोभा आणि जीभेचीही थोडी हौस पुरवली जाते.

कोबीची भाजी थोडी जास्त झाली ना, की त्यात कांदा आणि कोथिंबीर घालून, दोन तीन पिठं एकत्र करून मस्त थालीपीठ लावले ना की, विचारायलाच नको. बरोबर थोडंसं कैरीचं लोणचं

आणि दही. अगदी फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये सुद्धा त्याची रेसिपी किंवा तोड मिळणार नाही.

असा विचार करता करता मनात आलं माणसाचंही काहीसं असंच आहे नाही का? नेहमी हसत मुख राहणारा, आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेणारा, एवढेच नाही तर सगळ्यांच्या उपयोगी पडणारा सतत बाजू सांभाळून घेणारा असा मित्र, घरातली व्यक्ती, कधीतरी तिला गृहीत धरलं जातं. असं असेल तर आपण अन्यायच करतो त्या व्यक्तीवर.

पण नंतर जाणवतं, की ही माणसं न बोलता किती मदत करतात आपल्याला. त्यांच्या असण्यानं आपल्या आयुष्याची रंगत वाढते. आपल्याला त्यांचा आधार वाटतो, दिलासा मिळतो.

म्हटलंच आहे, की प्रत्येकात काहीतरी चांगलं असतं. फक्त ती दृष्टी आणि वृत्ती आपल्यात असली, तिचा उपयोग करता आला की सगळं कसं छान वाटतं.

पदार्थात रंग, रस, स्वाद आणि चव हे सर्व गुण असावेत अशी आपण अपेक्षा करतो. तसंच माणसांनीही आपल्या जिभेवर गुळाचा खडा ठेवून, आपल्या परीने इतरांना मदत करण्याचे व्रत अंगिकारलं, तर आयुष्य किती बहारदार होईल नाही का?

# ८. मुक्त चिंतन – १ - दिवाळी



अशी दिवाळी तशी दिवाळी, सांगा तुम्हाला हवी कशी दिवाळी ?

सडा सारवणं केंव्हाच सरली,

ते बंबातल गरम पाणी दृष्टी आड झालं

हवेतला उष्मा वाढला

आणि पहाटेच्या उटण्या सहीत आंघोळीचं महत्व सरलं

आकसून गेलेल्या अंगणा बरोबर

रांगोळ्या पणत्यांची आरास कमी झाली

आणि मेड इन चायना च्या कंदिलांची सगळीकडे भरती झाली.

अंगणा बरोबर अंगणातले किल्ल्यांचे देखावे अदृश्य झाले

आणि दूरदर्शन वरच्या दिवाळी स्पेशल कार्यक्रमात तमाम नागरजन मश्गुल झाले.

लेकीसुनांच्या नोकऱ्यांमुळे
घरात दरवळणारा फराळाचा वास
नाकापर्यंत पोचेनास झाला
मग घ्यायला (वास आणि फराळ )
फडके, विष्णु स्टोअर्स पुढे लोकांची गर्दी होऊ लागली
वर्षभर चालणारी खरेदी
मॉल्स ला दिल्या जाणाऱ्या भेटी,
वाढदिवस आणि गेट टू गेदर च्या माऱ्यात
दिवाळीत एकदाच होणारी खरेदी अनावश्यक ठरू लागली

मामा, मावश्या,आत्या
एका हाताच्या बोटावर मोजण्या एव्हढे,
गेले सातासमुद्रापार

मग कमी झाला आनंद आजोळी जाण्याचा
वा कोणी आलं म्हणून आतिथ्य करण्याचा

असं जरी असलं मैत्रिणींनो
बी पॉझिटिव्ह क्लब च सदस्य व्हायचं
आणि होणाऱ्या बदलाला हसत मुखानं सामोरं जायचं

so sweet, cute, fantastic, amazing हे शब्द तोंडात घोळावयाचें
आणि बाल, व नवतरुणांच्या आनंदात सहभागी व्हायचं

छापाची असेल पण असतेना दारापुढे रांगोळी
विकतचा का असेना लागतो ना कंदील दारी

उटणं नसलं तरी होते ना body wash ने सुगंधित आंघोळ
आणि संस्कार म्हणून केला जातो ना एकत्र फराळ

आग्रहानं बोलावल्यावर येतात ना

कार्यमग्न नातेवाईक जेवायला वर्षातून एकदा

हेही नसे थोडके म्हणायचे

आणि आनंदाचे चार शिंतोडे अंगावर घ्यायचे अत्तरा सारखे

सतत जुन्या आठवणींचे गंध कशाला उगाळायचे?

आणि त्याचे कौतुक नसणाऱ्यांच्या माथी थापायचे ?

नऊवारीचं पांचवारी होता होता,

पंजाबीड्रेस आपण स्वीकारला

चाळ सोडून ब्लॉक मध्ये येता येता

विभक्त कुटुंब पद्धती अंगिकारली

पोहे थालीपिठा बरोबर

डोसे उत्तपे आपलेसे केले

आज जातोच ना

मामाचा गाव पाहायला अन दाखवायला, रिसॉर्ट मध्ये

पतवंडंही करतील

जुन्या दिवाळी पॅकेज च स्वागत

आणि हुरहुरतील मनांत “wow what a fantastic festival they had!”

# ९. मुक्त चिंतन - २ - वाढदिवस

वाढदिवस, म्हणजे खरं तर जन्मदिवस.

आपण वय वाढतं म्हणून त्याला वाढदिवस म्हणतो. लहान असताना नवे कपडे, आवडीचा गोड पदार्थ याचं अप्रूप असे आपल्याला.

त्या बरोबरच शाळेत गोळया खाऊ वाटायचा ही पण एक गंमत असे. म्हणजे आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घ्यायचं ही जणू शिकवण त्यातून मिळायची. हे तेव्हा मात्र कळत नसे.

त्यादिवशी युनिफॉर्म ची सक्ती नाही, हा सुद्धा एक आनंद. थोडं मोठं झालं की हे सर्व मागे पडत असे. तरी वाढदिवस म्हणून आनंद होतोच.

मग कॉलेजच्या वयात शाळेतल्या जुन्या मैत्रिणी आणि कॉलेजमधल्या नव्या मैत्रिणी यांच्यासमवेत तो साजरा होई. एक वेगळाच आनंद.

अर्थात हातातला मर्यादित पॉकेटमनी आणि त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीनुसार फारतर एखादा सिनेमा, त्या दिवशी

आनंद देऊन जात असे.नंतरची काही वर्ष तो दिवस थोडासा दडपणात जातसे विशेषतः मुलींचा.

अगबाई ! २१वं लागलं, आता लग्न व्हायला हव यावर्षी. असा सल्ला घरातल्या पोक्त आत्या, मामी कडून ऐकून घ्यावा लागे. आणि कधीतरी कोणाच्या मनात थोडी अपराधीपणाची भावना ही निर्माण होत असे.

पण तो काळाचा महिमा.



आता तसं काही नाही. वाढदिवस पण दणक्यात साजरे होतात. लग्नानंतर नव्या नव्हाळी चे दिवस सोडले तर मुलांच्या वाढदिवसात आपला वाढदिवस महत्त्वाचा राहत नाही. आणि वाढत्या वयानुसार वाढदिवसाचे अप्रूप, महत्त्व कमी होत जाते.

नंतर तर **"सरलेली वर्ष जास्त की उरलेली?"** असा प्रश्नही नकळतच मनात निर्माण होतो..

तरीही त्या दिवशी आपणाला आनंद होतोच.

लक्षात ठेवून पूर्वी वाढदिवसाला पत्र पाठवणे, फोन करणे मला फार आवडत असे. नेहमी कामाच्या व्यापात नाही होत संपर्क करायला, पण अजूनही त्या दिवशी जवळच्या व्यक्तींना फोन करून शुभेच्छा द्यायला मला फार आवडतं.

आता तर मोबाईल, व्हाट्सअप यामुळे तर सगळे फारच सोपे झाले आहे असं वाटतं. वय वाढतंय खरं, पण मलाही असा कोणाचा फोन आला की छान वाटतं.

एवढी वर्ष कुणाच्या तरी मनाच्या कोपऱ्यात आपल्याला जागा आहे, आपली आठवण आहे.

जुन्या आठवणीही आहेत बरोबर. ही भावना नक्कीच आनंददायी नाही का?

## १०.   मुक्त चिंतन - ३ - पुस्तक दिन

पुस्तकांची दुनिया
करी सारी किमया,
आठवण्या नाही कष्ट आता.

भोवति पुस्तकांच्या
फिरे सारे जग
देतसे अनुभूति लगोलग

किती प्रश्न तेव्हा
घर करीति मनांत
विचारण्यात वाटे लाज जनांत

पण नाही पुस्तकांनी
केले विन्मुख
दिले नेहमी ज्ञानाचे सुख

अशा पुस्तकांच्या चरणी
मी सदैव विनित

घालते त्यांना मनोमन दंडवत.

लहान पणापासून मला वाचनाची आवड. आमच्या इथे दर शनिवारी मुलांसाठी लायब्ररी असे. तिथे जाणे हा एक आनंद असे.



कारण शाळा सकाळी झालेली असे. पहिल्या शनिवारी येथे नवीन पुस्तकांचे वितरण होई आज जिथे संस्थेचे ऑफिस आहे तिथे ही लायब्ररी होती. आम्ही चारच्या आधी तिथे रांग लावून उभे रहात असू. नवं पुस्तक मिळालं की होणारा आनंद अवर्णनीयच. थोडं मोठं झाल्यावर मग मोठ्यांची लायब्ररी आपली वाटायची. दिवाळी अंक वाचनाचं वेड तर आजही टिकून आहे. म्हणूनच दिवाळी अंकांची लायब्ररी मी रहाते त्या भागात गेली तेरा वर्षे चालवत आहे.

ताज्या घडामोडीं, लघु उद्योग, समाजसेवी, कलाकार ह्यांची ओळख त्यातून होते. शांता शेळके होत्या तोवर "किस्त्रिम" मधल्या कविता वाचायला आवडत असे.

घरांत वडिलांना वाचनाची आवड, त्यामुळे खूप पुस्तकांचा संग्रह होता. मग सुट्टीत मुलांसाठी लायब्ररी ठेवणे, हे मला फार आवडे. लेबलां सारखी पुस्तकांची देवाणघेवाण चाले.

कॉलेजमध्ये तर लायब्ररीचे दोन मजले होते. त्या वयात अबब! म्हणायचेच बाकी होते. अशीच एशियाटिक, आणि भांडारकर प्राच्य विद्यामंदिराची वास्तू.

अमेरिकेत तर लायब्ररीत पूर्ण दिवस जाऊ शकतो. आसनव्यवस्थाही सुखकर असते. मुलीकडे असतांना केंब्रीज, हार्वर्ड आदी परीसरांत हे खूप जवळून अनुभवता आलें

हार्वर्ड स्क्वेअर जवळ एक पुस्तकांचे दुकान होते मी त्याला लायब्ररीच म्हणायचे. प्रत्येक शनिवारी तिथे जाऊन खूप पुस्तके हाताळली. मागेच कॉफी शॉप. मग काय मजाच. एकदा तर एवढा उशिर झाला, की जावई शोधत पोचले तिथे.

आपल्या परिचीत अशा पुस्तकांची यादी देत नाही, कारण वाचन प्रेमी प्रत्येकांनी त्याची पारायणे केली असणार. पण पुलं, बरोबरीने वपु, रत्नाकर मतकरी, गंगाधर गाडगीळ, पिंगे, शं ना नवरे, निरंजन घाटे, मंगला गोडबोले हेही माझे आवडते लेखक आहेत. आता कादंबरी नको वाटते. गेल्या चार पांच वर्षात वाचन कमी झालं आहे. 😊

आता सबबी कशाला सांगायच्या. जाऊ दे.

पण सध्या ययाति वाचायला घेतलं आहे. परत. बघू कधी वाचून होत.

# ११. मुक्त चिंतन - ४ - राम नवमी

उद्या राम नवमी. करोना च्या निमित्ताने रामायण महाभारताचे पुनर्प्रसारण मागच्या वर्षी सुरू झाले त्या वेळेला ते बघायचं असं ठरवलं त्याची आठवण झाली. राम कथा - खरंच त्या कथेत काहीतरी जादू आहे असं वाटत. आता रामकथा का आपल्याला नवीन आहे?



नाही अगदी वाल्याचा वाल्मिकी कसा झाला? तो पक्ष्याचा वध,त्यावेळेस उच्चारलेला "मा निषाद" हा श्लोक. जो अनुष्टुप छंदात ला पहिला श्लोक आहे हे आपल्याला माहित नाही का?

तरीसुद्धा "रामानंद सागर" ज्यांच्या नावातच राम आहे, त्यांनी ह्या कथेचे सादरीकरण खूपच मनापासून केले आहे असं वाटतं.

आणि म्हणूनच ते सर्व काही खूप छान झाल आहे. मनाला आनंद देणारं. तीस वर्षात तंत्रज्ञानाने अफाट प्रगती केली आहे, वेग घेतला आहे तरीही आज रामायण पाहताना ते आपल्याला आड येत नाही. लक्ष्मणाचं बंधुप्रेम असंच एक कोडं. आपल्या पत्नीला आयोध्येत ठेवून हा रामाबरोबर वनवासाला निघतो. एवढेच नाही तर प्रत्येक प्रसंगात त्याने रामाला दिलेली साथ ही अवर्णनीयच आहे.

मारुतीची रामभक्ती तर अलौकिक. त्याच्याविषयी काय बोलायचं?

रावण वध म्हणजे दुष्टांचा विनाश. तरीही ते पाहताना एक गोष्ट जाणवत राहते. जर बिभीषण नसता तर?

शत्रू गोटातल्या सर्व गोष्टी, राक्षस राज्यातील सर्व बारकावे जाणारी ही व्यक्ती सतत बाजूला नसती तर?

चांगल्याची भलावण हे जरी खरं असलं तरी फितुरी हे सुद्धा रावणाच्या पराभवाचे एक कारण आहे ही गोष्ट नजरेआड करता येत नाही. सर्वजणांनी परोपरीने समजावून सुद्धा रावण ऐकत नाही म्हणजे शेवटी "अहंकार", अतिरेक हा सर्वनाशाला कारणीभूत ठरतो.

एवढा अतुलनीय पराक्रमी राम, मर्यादापुरुषोत्तम. पण सीतेचा, जिने अग्निपरीक्षा दिली तिचा, लोकापवादला घाबरून परत त्याग

करतो? डोक्यावरचा चक्रवर्ती राजाचा मुकुट त्याला हे करायला भाग पाडतो का? हे टाळता येणार नव्हतं का?

हे प्रश्न आपल्याला सतावत रहातात.

म्हणजे चांगलं वाईट दोन्ही कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातकच. सुवर्णमध्य साधता आला पाहिजे. ही गोष्ट परत अधोरेखित होते.

रामराज्य म्हणताना शेवटी तो आपले भाऊ, त्यांची मुलं, यांच्यामध्ये राज्याची योग्य ती वाटणी करून जगाचा निरोप घेतो. ही गोष्ट ही नकळतपणे खूप काही आपल्याला शिकवून जाणारी आहे हल्लीच्या काळाचा विचार करता ज्यांची औद्योगीक किंवा इतर साम्राज्ये आहेत, त्यांनी असा विचार करायला नको कां?

रामायण आणि रामकथा प्रत्येकच काळात प्रत्येकाला काही ना काही तरी देते. सुधीर फडके आणि गदिमा यांचं " गीतरामायण" हे सुद्धा एक असंच आलौकिक आणि दैवी आहे असं मला ऐकताना नेहमी वाटतं.

रामायणाच्या कथेमध्ये एक उपकथानक आहे. अयोध्येतून निघालेले "प्रभूराम" गंगातिरी येतात. नावाडी त्यांना गंगा नदी पार करून नेतो. जेव्हा श्रीराम त्याला, त्याच्या ऋणातून मुक्त होण्याची इच्छा व्यक्त करतात. रामाला नदीपार करून देणारा तो नावाडी

शेवटी त्याला म्हणतो की **"पार किया मैने तुमको अब तु मोहे पार करे"**

खरोखर नावाड्याची अध्यात्मिक जाण पाहून थक्क व्हायला होतं.

अशा या रामकथेला, त्यातील वर्णन केलेल्या व्यक्ती, आदर्श, ह्या सर्वापुढे मी नतमस्तक आहे. खूप वर्षापूर्वी लिहीलेली

**यावत् स्थात्स्यन्ति गिरयः सरितः च महीतले**

**तावत् रामायणी कथा लोकेषु प्रचरिष्यति|**

ही उक्ती मनोमन पटते.

## १२. मुक्त चिंतन - ५ - माझं आवडते झाड

**निसर्गाचं लेणं विश्वाच देणं**

**माणसाला कसं चुकेल त्याचं देणं घेणं**

अग्नीचा लागला शोध

बराच झाला माणसाला बोध

शेतीच्या शोधाने स्थिरता

तर चाकामुळे आली आणि गतिमानता

माणूस पुढे धावू लागला

निसर्गाला कवेत घेऊ लागला

चंद्र-मंगळाची स्वारी

पडू लागली अपुरी

मानवजात सोडाच

तो निसर्गावरही लागला करू कुरघोडी

पण

कोरोना विषाणू ने दिला दणका

हे कमी म्हणून वादळाचा तडाखा

इकडे घोंगावत आहेत उल्का डोक्यावर

सुधारेल का मानव एव्हढं तरी झाल्यावर?

साधायला हवी प्रगती

निसर्गाचा मान राखून

करायला हव ना निसर्ग रक्षण

कृतज्ञतेने मनापासून.

२०२० साली पर्यावरण दिनाला ह्या पद्य पंक्ती लिहील्या आणि मनांत विचार आला,



विज्ञानाच्या प्रगतीबरोबर आपण निसर्गाशी असलेला आपलं नातं,

आणि आपण निसर्गाचे देणे लागतो हे आपण विसरलो आहोत की काय?

अगदी साध्या गोष्टी आपण नाही का करू शकत? एक तर "झाडे लावा, झाडे जगवा" आणि दुसरी इतक्या वर्षानंतर आपल्या लक्षात आलेली गोष्ट म्हणजे,

प्लास्टिकचा कमीत कमी वापर करणे.

पण हे सगळं माहीत असलं तरी सुद्धा आपल्या हातून काही चुका होत असतात.

खरच, केवढी विविधता आहे या वनस्पती सृष्टी मध्ये.

अगदी छोट्या रोपट्या पासून ते मोठ्या वृक्षा पर्यंत. काही फुल देणारी, फुलांच्या रंगाने आपल्या डोळ्यांना आनंद देणारी, चित्तवृत्ती उल्हासित करणारी अशी झाडं.

तर काही वर्षानुवर्ष उभी राहिलेली, फळ देणारी, काही नाही तर निदान सावली देणारी अशी कितीतरी झाडं आपण बघतो

आणि मग आपल्याला या निसर्गाचा खरंच खूप आदर वाटायला लागते.



पुराण पुरुषासारखा उभा असलेला पिंपळ, शुद्ध हवा देणारा वड. उन्हाळा संपत आल्याची सूचना देणारा गुलमोहर, किती नाव घ्ययची?

**पण मला मात्र आवडतेती परस बागेतली केळ**.

ना पानांची सळसळ, ना फुलांचा शृंगार. पण बहुपयोगी.

नैवेद्य वाढावा तर केळीच्या पानावरच.

ते पान गाईंनी खाल्ल की तिलाही चांगलं आणि पर्यावरणालाही पूरक.

केळफूल जरा चिरायला किचकट, पण भाजी फार छान आणि थोडी नेहमीपेक्षा वेगळी. हे लागलेलं केळफूल कधीकधी घरातल्या नवविवाहितेच्या गर्भारपणाची ही सूचना देत.

लग्नमंडपात दाराला लावलेले केळीचे खांब आणि आंब्याच्या पानांचे तोरण,आणखी कोणता शुभशकून हवा?

केळफुलात केळी तयार झाली की जणू त्याच्या जीवनाची इतिकर्तव्यता होते.

तेव्हा ते मला समाधी घेणाऱ्या ज्ञानेश्वरांची आठवण करून देते.

पण हे नकारात्मक नाही बरं,

तिथेच थोड्या दिवसांनी नवीन केळीचे झाड डोकावू लागतं आणि परत एका नव्या जीवनाची सुरुवात होते.

# १३. प्रवासातील अशाही गंमती जंमती
## अमेरिका प्रवास

१९९२ च्या सुमारास माझ्या मिस्टरांना त्यांच्या नोकरीमुळे, कामानिमित्त अमेरिकेला जाण्याची संधी प्राप्त झाली. आता त्या काळामध्ये काही प्रत्येकाचे पासपोर्ट वगैरे तयार नसत. पण एकदा मिस्टर तिकडे जाणार म्हटल्यावर जाताना आम्हा तिघींचे पासपोर्टचे फॉर्म भरून पासपोर्ट ऑफिस मध्ये त्यांनी दाखल केले. माझा पासपोर्ट रितीप्रमाणे येऊन गेला. पण माझी धाकटी मुलगी वयाने बरीच लहान असल्यामुळे तिची त्या फॉर्मवर सही केलेली नव्हती. म्हणून पासपोर्ट ऑफिसमध्ये आम्हाला तिची सही करण्यासाठी म्हणून जावे लागले. त्यानंतर या दोघींचेही पासपोर्ट आले.

तीन महिन्याच्या कामासाठी म्हणून मिस्टर गेले होते. करता करता आता त्यांना तिथे दीड वर्ष राहावं लागणार असं कळलं. एव्हडा काळ राहणार म्हटल्यानंतर कंपनीने आम्हालाही या प्रवासाची संधी उपलब्ध करून द्यायच ठरवलं. तरीसुद्धा व्हिसा हा आमचा आम्हालाच करायचा होता.

त्या काळामध्ये अमेरिकन व्हिसा मिळवण ही फार मोठी गोष्ट होती. कुठल्याही प्रकारची अपॉइंटमेंट वगैरे दिली जात नसे. सकाळी जाऊन अमेरिकन काउन्सुलेट पुढे रांगेत उभं राहावं लागायचं. आणि मग काही एका ठराविक नंबर पर्यंतच्या लोकांना ते त्या दिवसा करता आत घेत असत. आता दोन लहान मुलींना घेऊन त्या अमेरिकन काउन्सुलेट इथपर्यंत जायचं, परत बरोबर रोख पैसे सुद्धा, त्या वेळेला कार्डाची वगैरे पद्धत नव्हती. त्यामुळे कॅश भरावी लागत असे व्हिसा मिळाल्यानंतर. त्यामुळे तेवढे त्याचे पैसे बरोबर घेऊन तिथ पर्यंत जाणं ही माझ्यासाठी एक फार मोठी गोष्ट होती. तरीसुद्धा माझी बहीण देखील अमेरिकेला राहत असल्यामुळे तेथे जायचं आकर्षण तर होतच.

मग एक दिवस आम्ही व्हिसासाठी जाण्याचे ठरवले. माझ्या लहान मुलीसाठी बरोबर ड्रॉइंग चे पुस्तक थोडासा खाऊ आणि वाचायला एक पुस्तक घेतलं.अकरा, बारा तरी तुम्हाला तिथून बाहेर पडेपर्यंत वाजतील. अधे मधे तुम्ही तिथून तुम्ही बाहेर पडू शकणार नाही, आणि मग तुम्हाला व्हिसा मिळाला तर तो घेण्यासाठीही परत एकदा चार वाजता जावं लागेल असं सांगण्यात आलं होतं.

आम्ही सकाळी साडेसात आठ च्या सुमारास काउन्सुलेटला जाऊन पोचलो. आणि त्या ठिकाणचे जे काही सोपस्कार होते ते पूर्ण करून आत मध्ये जाऊन बसलो. ज्या वेळेला आमच्या नावाची घोषणा झाली त्या वेळेला आम्ही तिघीजणी त्या काऊंटरपाशी जाऊन उभ्या राहिलो एक-दोन जुजबी प्रश्न विचारल्यानंतर त्या काउन्सुलेट मधल्या बाईने तुमचा या मुलीच्या फोटोच लॅमिनेशन निघालेल आहे असं सांगून जवळजवळ आमचे जे पासपोर्ट होते ते आमच्या अंगावर फेकले असेच म्हणावे लागेल. एवढस तोंड करून मी तिथून निघाले. आता काय करायच? अपमान हा अपमानच असतो, आणि त्यात अमेरिकन काउन्सुलेट मध्ये एका बाईने अशा पद्धतीने आपल्याशी वागावं ही गोष्ट मला मनाला फारच लागली. त्यामुळे तिथून मी टॅक्सी करून तडक पासपोर्ट ऑफिस गाठलं.पासपोर्ट ऑफिस मध्ये "ढोबळे" नावाचे गृहस्थ होते यांच्याशी थोडाफार परिचय माझ्या धाकट्या मुलीची पासपोर्ट फॉर्म वरची सही करायला आम्ही गेलो होतो तेव्हा झालेला होता.

मी त्यांच्या केबिनमध्ये गेले आणि त्यांना झालेला प्रकार सांगितला. ते म्हणाले तुम्ही काही काळजी करू नका. या या

नंबरच्या खिडकीवर जा आणि ते तुम्हाला तो फोटो आहे तो नीट लॅमिनेट करून देतील.

आता तो करून घेतल्यानंतर आम्ही घरी आलो. आमच्या दृष्टीने तो दिवस वाया गेलेला होता कारण मुलींच्या शाळेची सुट्टी बघून, कामाचे नियोजन करून मी त्या ठिकाणी गेले होते, पण काही उपयोग झाला नाही.

आता परत दहा दिवसांनी जाण्याचे ठरवले तेव्हा पैसे बरोबर घेऊन जायचे म्हणून मी परत सुट्टीचा दिवस निवडला. कुठलातरी मुसलमानांचा सण होता. त्यामुळे त्या दिवशी इतर ऑफिसेस बंद होती पण काउन्सुलेट मात्र चालू असणार होतं. त्यामुळे जाता-येता गाडीला जरा कमी गर्दी असेल. हा विचार माझ्या मनात आला, पैशाची ही जोखीम बरोबर होती. आता मागच्या वेळे प्रमाणेच, सगळं, खाऊ, त्याच्या नंतर ड्रॉइंग पुस्तक वगैरे घेऊन आम्ही काउन्सुलेटला पोचलो.

मागच्या वेळी एकदा जाऊन आल्यामुळे आता थोडासा धीर आलेला होता. पण दहा दिवसात काउन्सुलेटचे नियम बदलले होते.

आमचा नंबर आला. आम्हाला सांगितलं तुम्हाला ही बॅग घेऊन जाता येणार नाही, आणि आम्ही बाहेर या पिशवीची जबाबदारी घेणार नाही.

आता आली का पंचाईत. सकाळची वेळ, रस्ता म्हणजे रस्त्यावर कुठेही दुकान किंवा असं काहीच नव्हतं. बॅग ठेवायची कुठे? तसं बघितलं तर त्याच्यात काही खूप महत्त्वाचं होतं असं नाही. पण आपला स्वभाव असतो ना? त्याला कुठलं औषध? मग मी बाहेर संशोधन करण्याचे ठरवले, कुठे एखाद्या बिल्डिंगचा वॉचमन मराठी आहे का? आता एवढ्या सकाळी दुकान तरी कुठलं उघडे असणार? एक, दोन दुकानं होती पण सगळी बंद. माझ्या सुदैवाने एक ज्यूस सेंटरवाला दुकान उघडतो आहे असं दिसलं. त्याच्याकडे गेले आणि त्याला माझी अडचण सांगितली. तर तुम्ही एक अकरा बारा वाजेपर्यंत ही पिशवीत ठेवून घ्याल का? असं त्याला विचारलं. खाऊ आणि ड्रॉइंग चे पुस्तक वगैरे सगळं बरोबर घेतलेलं होतं, ती पिशवी त्याच्या इथे ठेवली. पाण्याची बाटली सगळं काही तिथे ठेवून परत मुलींना घेऊन आले. एकदाचा आत मध्ये आमचा प्रवेश झाला.

आत त्या ठिकाणी आम्ही एकदाचे स्थानापन्न झालो. आमच्या नावाची उद्घोषणा झाली. त्यानंतर आम्ही सांगितलेल्या

काऊंटरपाशी गेलो. तिथे आम्हाला थोडे जुजबी प्रश्न विचारण्यात आले, की तुम्हाला कशासाठी जायचे वगैरे. मग एका विशिष्ट नंबरच्या काऊंटर पाशी जाऊन पैसे भरण्याची सूचना करण्यात आली.

याचा अर्थ आम्हाला व्हिसा मिळालेला होता. म्हणून एक निश्वास टाकला, आणि मी पैसे भरण्याच्या काऊंटरपाशी गेले. त्या ठिकाणी, त्या वेळेस सुद्धा पैसे मोजण्याचे मशीन होते. आता माझ्या नोटा त्या पद्धतीने लावलेल्या नव्हत्या. म्हणजे परत एकदा नोटा लावण्याचं काम मला त्या ठिकाणी करावे लागले. थोडीशी अमेरिकन काउन्सुलेट मध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाची नाराजी सहन करावी लागली.



एवढ झाल्यावर पासपोर्ट पोस्टानी घरी पोचविण्याचे पैसे भरून आम्ही निघालो.  स्टेशनवर येई पर्यंत वाटेत ज्यूस सेंटरला ठेवलेली बॅग घेतली.  तो मालक मोबदला घेत नव्हता, मदत केली त्याबद्दल. तिथे मुलिंना ज्यूस दिला आणि मार्गस्थ झालो.

आता पुढची कथा.

दिवाळीच्या सुट्टीमध्ये एक महिना यू.एस्.ए.ची ट्रीप करून यायची असे ठरले. त्याप्रमाणे कंपनीने तिकिटांची व्यवस्था सुद्धा केली. त्यावेळी तिकीटाची व्यवस्था ही ट्रॅव्हल एजंट मार्फत केली जात असे. तिकीट मिळाले की त्यावर एक ट्रॅव्हल एजंट एक स्टॅम्प मारत असे. हे तिकिट योग्य आहे ह्याची खात्री करून घेण्यात आली आहे असा त्याचा अर्थ. त्यावर सकाळी सहाची वेळ लिहिलेली होती. विमान एअर इंडिया विमान कंपनीचे. जाताना माझे मिस्टर



सुद्धा सकाळी सहा च्या विमानाने गेले होते त्यामुळे शंका घ्यायला जागा नव्हती.

तरीसुद्धा जाण्यापूर्वी एकदा विमानतळावर फोन करून उद्या विमान वेळेवर सुटणारआहे ना याची आम्ही चौकशी करून खात्री करून घेतली. त्यांनी पण विमान वेळेवर सुटणार आहे काळजी करू नका असे आम्हाला सांगितलं. वेळेचा उल्लेखच झाला नाही.

कमीत कमी तीन साडेतीन वाजता तरी विमानतळावर जावं लागणार. एवढ्या पाहाटे पासून कशाला मुलींना विमानतळावर न्यायचं? मी आधी सामान "चेक इन" करून येते आणि मग नंतर मुलींना घेऊन जाऊ असा मी विचार केला. ठरल्याप्रमाणे माझा भाऊ मला घ्यायला आला आणि सर्व सामानासह विमानतळावर पोहोचले. विमानतळावर पोचले. जेथे बॅगांची तपासणी करतात त्या ठिकाणी अगदी शुकशुकाट होता. आणि कुठेही गर्दी नाही, लाईन नाही, मला वाटला आपण खूपच लवकर आलो की काय?

त्या ठिकाणी काम करणारा कर्मचारी वर्ग मला विचारायला लागला की तुमचं कोणत्या विमानाचं तिकीट आहे? मी त्यांना तिकीट दाखवलं, तेव्हा ते म्हणाले तुमचं नाव काय? नांव सांगितल्या नंतर त्यांनी सांगितलं आज विमानाची वेळ पहाटे साडेतीन ची होती. आणि इतका वेळ तुमच्या नावाची

अनाऊंन्समेंट  होत होती. आत्ताच विमानाचे दरवाजे लागले. हे ऐकल्यानंतर माझ्या हाता पायातले जणू त्राणच गेले.

आता काय करायचं एक मोठं प्रश्नचिन्ह माझ्यापुढे उभ राहिले. "तिकिटाचे पैसे बहुतेक वाया गेले". असा विचार माझ्या मनात आला.

तरीही प्रसंगावधान राखून मी एअर इंडियाचा काऊंटर कुठे आहे अशी विचारणा केली. माझा भाऊ बाहेर उभा होता. काहीतरी गडबड झाली आहे हे त्याच्या लक्षात आलं. मुलिंना आणायला परत घरी जायचं होत, त्यामुळे तो थांबून राहिला होता.

तरीही मी बाहेर न जाता एअर इंडियाच्या काउंटरवर गेले. त्या ठिकाणी माझं तिकीट दाखवले. त्यावर तिथला कर्मचारी म्हणाला की तीन दिवस सकाळी सहा वाजता आणि तीन दिवस पहाटे साडेतीन वाजता विमान सुटत. आजच विमान साडेतीनच होतं.

आता त्या ठिकाणी माझी थोडी काउंटरवर बोलाचाली झाली. मी म्हटलं की "आम्ही रोज प्रवास करणारी माणसं नाही त्यामुळे हे आम्हाला माहीत असण्याचं काही कारण नाही." "आणि माझ्या तिकीटावर विमानाची वेळ सहा अशी लिहीलेली आहे त्याप्रमाणे मी साडेतीन वाजता विमानतळावर आले.मला माझं काही चुकलं

आहे असं वाटत नाही"."आता आपण काय करु शकतो? आणि काही मार्ग आहे कां? ते तुम्ही मला सांगा."

कर्मचारी सहकार्य करणारा होता.

दुसर्या दिवशी रात्रीच्या, पहाटेच्या साडेतीनच्या विमानाचं आम्हाला तिकीट देण्यात आल. आणि मग मी एअरपोर्ट मधून बाहेर पडले. एअरपोर्टवरून घरी येत असतानाच डोक्यात खूप विचार चालू होते. आता घर तर सगळं बंद केलेलं होतं. त्या काळचे फ्रिज ऑटोमॅटिक डीफ्रॉस्ट होत नसत, त्यामुळे फ्रिज बंद केलेला, कामाच्या बाईला नको येऊ म्हणून सांगितले अशा परिस्थितीत एक दिवस सर्व चालू करायचं आणि रात्री रात्री बारा-साडेबाराला एअरपोर्ट वर जायला निघायचं. प्रश्न पुढच्या १४ तासांचा होता. म्हणून मी मुली, आई यांना घेऊन आईकडेच थांबायचे ठरविले. दिवसभर लागेल एवढे सामान फक्त वरती ठेवलं आणि घर बंद करून आम्ही निघालो.

त्या दिवशी रात्री मला विमानतळावर सोडण्याची जबाबदारी माझ्या मोठ्या बहिणीने घेतली कारण माझा भाऊ कामानिमित्त बाहेरगावी जाणार होता.

ठरल्याप्रमाणे बहिण आम्हाला विमानतळावर सोडण्यासाठी आली. सगळे सोपस्कार पूर्ण झाले. त्यावेळेस चेकिंग केल्यानंतर सुद्धा आपण बाहेर येऊ शकत असू. त्यामुळे मी येऊन बहिणीला सगळं काही व्यवस्थित झाल्याचं सांगितलं आणि नंतर ती परत गेली.

त्यावेळी डायरेक्ट फोन करण्याची सोय नसल्यामुळे मिस्टरांनी ट्रंक कॉल करून आम्ही विमानतळावर पोचलो ना याची चौकशी करून घेतली होती. हा आमचा प्रवास तसा खूपच मोठा होता. मुंबई ते दिल्ली, दिल्ली ते लंडन, लंडन ते जे एफ् के, तिथे विमानतळ बदलून परत सिनसिनाटीसाठी विमान गाठायचे होते.

दिल्ली येईपर्यंत तर बाहेर अंधारच होता त्यामुळे विमानाच्या खिडकीतून बाहेर बघण्याची काही फारशी मजा नव्हती. पण दिल्ली ते लंडन प्रवासात मात्र लंडनला सकाळी सात वाजता विमान पोहोचत असल्यामुळे थोडंसं शहराचे दर्शन आम्हाला झाले. आता इतका वेळ विमानात बसायचं म्हणजे लहान मुलांना शिक्षाच. त्या वेळेला काही प्रत्येकाला स्वतंत्र स्क्रीन उपलब्ध नव्हते. तर एका विभागांमध्ये सगळ्यांना मिळून एक स्क्रीन लावलेला असे. पण खानपान सेवा मात्र छान होती.

लंडनला "क्रू" बदलला आणि वेगळा "सेवक वर्ग" विमानात दाखल झाला.लहान लेकीला रमवण्या करता म्हणून मी तिला तिची ड्रॉईंग बुक आणि दिवाळी होमवर्क ची वही बाहेर काढून दिली, आणि आता तू हे लिहीत बस असं सांगितलं.आता परत नऊ तास प्रवास होता.

तेव्हा ती लहान मुलगी काय लिहिते आहे हे बघायला म्हणून एक "पर्सर" जवळ आला.

त्याच्याशी बोलताना आणि त्याचा चेहरा पाहून मला आपण याला कुठेतरी भेटलो आहोत असं वाटलं. आणि मी त्याला त्याचे आडनाव विचारले. त्यांनी त्यांचे आडनाव सांगितले,तेव्हा माझ्या लक्षात आलं की हा आपल्या बहिणीला भेटायला म्हणून आपल्या घरी येऊन गेलेला आहे. त्याला तसे विचारल्यावर त्यालाही ओळख पटली.

मग काय विचारता, मुलींची अगदी चंगळच झाली.

मुलींना आवडणारा सिनेमा ज्या विभागात असे तिथे तो त्यांना येऊन बसवत असे. एवढेच नाही तर संपूर्ण विमान दाखवून, त्यांनी मुलींच्या बरोबर मलाही कॉकपिटमध्ये येण्याची विनंती केली. आणि त्या ठिकाणी आम्हाला विमानाची सगळी माहिती मिळाली. हा जो काही अनुभव होता ना तो अगदी वेगळाच आणि

आश्चर्यचकित करणारा असाच होता. मुलींना पहिल्याच परदेश प्रवासात कॉकपीट पर्यंत जायला आणि पायलटशी बोलायला मिळाल.

आदल्या दिवशी च्या विमनस्क करणार्या घटनेचा मागमूसही राहिला नाही.

जे एफ् के ला उतरताना त्यांनी माझ्या हातामध्ये दोन-तीन कोकचे कॅन आणि स्नॅक्स असलेली पिशवी आणून दिली. तुमची मुलगी काहीच खात नाही. अजून तुम्हाला बराच प्रवास आहे तेव्हा हे जवळ असू दे. अजून खूप लांब जायचं आहे.

खूपच आपुलकीची आणि प्रेमाची अशी वाटली मला त्याची वागणूक.

जे एफ् के ला माझी मोठी बहीण येऊन थांबलेली होती. त्या ठिकाणी आम्हाला आमचं "लगेज" कलेक्ट करायचं नव्हतं त्यामुळे दुसऱ्या विमानतळावर जाण्यासाठी म्हणून आम्ही बाहेर आलो. बहिणीने तिच्या मोटारीने आम्हाला दुसऱ्या विमानतळापर्यंत सोडलं त्यामुळे टॅक्सी वगैरे करण्याचा किंवा विमानतळावरून निघणारी बस घेण्याचा काही प्रश्न आला नाही.

इथें विमानात गेल्यानंतर मात्र मला अशी झोप लागली की काही विचारू नका.

शेवटी विमानातल्या "एअर होस्टेस" नी मला विचारलं की तुमचा किती तासांचा प्रवास झाला आहे? तुम्ही कुठून आला आहात? आता काय सांगणार तिला सगळी कथा.

पण विमानातून उतरल्यानंतर मात्र समोर "बाबांना" बघून मुलींना जो काही आनंद झाला तो विचारूच नका. मलाही "आपण सुटलो बुवा," अशीच भावना झाली.

आम्ही घरी गेलो. घरी गेल्यानंतर थोड्याच वेळात, जरी ऋतू वेगळा होता तरी थोडी थोडी बर्फवृष्टी सुरू झाली. हे आम्ही प्रथमच पहात होतो. हे आकाशातून पडणार बर्फ स्वागताची सलामीच देत आहे अस वाटलं.

खरोखर कधीही विसरू शकणार नाही असा हा पहिला विमान प्रवास हे बाकी खरं.

# १४. प्रवासातील सुखदः अनुभव - १ - सिमला प्रवास

प्रवासाची आवड प्रत्येकालाच असते "केल्याने देशाटन" आपण सगळे जण लहानपणापासूनच ऐकत असतो, आणि खरं सांगायचं तर जेवढा काही प्रवास केला त्याच्या मध्ये त्याची सत्यता पटली.

प्रवासात आलेले वेगवेगळे अनुभव माणसाला खूप समृद्ध करतात, कधीतरी पुनःप्रत्ययाचा आनंद सुद्धा आपल्याला त्यामधून मिळतो. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे फोटो आपण काढतो ते फोटो बघताना सुद्धा आपल्या आठवणी जागृत होत असतात.

अगदी लहानपणी मी केलेला प्रवास म्हणजे मला वाटतं मी औरंगाबाद आणि नागपूर या दोन ठिकाणी गेले होते. औरंगाबादला माझी एक आत्या राहात असे तिच्याकडे आम्ही गेलो होतो आणि नागपूरला माझ्या बहिणीच्या लग्नाच्या निमित्ताने  म्हणून प्रवास केला. त्यानंतर मग आता गेली पन्नास वर्ष बरेचदा तो नागपूरचा प्रवास होतच राहिला. पण त्या प्रवासाच्या परी बदलत गेल्या. पहिल्यांदा हा प्रवास होता तो थ्री टायर चा प्रवास होता. नंतर थ्री टायर एसी चा झाला मग टू टायर एसीचा झाला. असे वेगवेगळे

त्याच्यामध्ये बदल झाले पण एकूणच या प्रवासाने सुद्धा मला खूप आनंद दिलेला आहे.

औरंगाबादहून येताना ते जुन धुराच इंजिन, त्याच्या मधून बाहेर येणारा तो काळा धूर, आपण हात किंवा तोंड बाहेर काढलं की सगळ काळ होऊन जाणारे तोंड. ही तर एक वेगळी मजा होतीच पण गाडी मधे मधे थांबत असे तेव्हा, आदिवासी लोक करवंद, जांभळं असा रानमेवा विकायला येत असत आणि पानाच्या द्रोणा मधूनच, बदामाची वगैरे पानं असतात त्याच्या मधून तो रानमेवा ते विकत असत. आजच्यासारखा प्लास्टिक नाही बर का,सगळ पर्यावरणाशी जवळीक साधणारं. अशा सगळ्या गोष्टी होत्या. आज जेव्हा आपण प्रवास करतो त्या वेळेला त्या गंमतीला एसी डब्यामुळे लहान मुलं सुद्धा मुकतात असं मला वाटतं.

असाच एक सिमल्याचा प्रवास आई,बाबांबरोबर झाला. मी तेरा वर्षांची असेन. मुंबई, दिल्ली, दिल्ली, काल्का आणि काल्का ते सिमला असा जवळ जवळ ३६ तासांचा प्रवास.

पण फर्स्ट क्लास ए. सी. डबा. त्या डब्यात स्वतंत्र टॉयलेट, बेसीन. मी तर हे सर्व प्रथमच आगगाडीत अनुभवत होते.

त्या गाडीच किचनही छान होतं. अजूनही तेव्हा खाल्लेले कटलेट आठवतात. छान काचेची डिश, सॉस बाटली मधून,

टिकोझी वाल्या किटलीतला चहा. खूपच शाही थाट वाटला.पॅलेस ऑन  व्हिल्स चा थाट त्यापेक्षाही असेल.



पण तेव्हा त्या सगळ्याच खूप कौतुक वाटलं. "कालका"हून सिमल्याला जाताना एवढे मोठे, मोठे बोगदे होते. की कसं काम केलं असेल हे? असा प्रश्न पडावा. दोन्ही बाजूला मैलोनमैल पसरलेली गव्हाची शेत, दूरवर दिसणारी पर्वताची शिखरे, वहाणारे पाटाचे पाणी. अचंबित करणारं निसर्ग सौंदर्य.

त्यानंतर किती तरी आरामदायी प्रवास झाले. पण हा प्रवास विसरण अशक्यच.

# १५. प्रवासातील सुखद अनुभव - २ - वसंत बापट

९४ साल असेल. मोठी मुलगी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाली, म्हणून पुण्याला जायच होत, आईला भेटायला. आईच्या जुन्या जागेचे रिडेव्हलपमेंटचे




काम चालू होते. म्हणून ती पुण्यात होती. जाताना मुलींना गंमत म्हणून दख्खनच्या राणी चे ए.सी. पहिल्या दर्जाचे आरक्षण केले.

जून महिना, पावसाचे दिवस. गाडी सुटली वेळेवर. पण "कल्याण" स्टेशन गेल आणि मोठ्ठा

आचका देऊन गाडी थांबली. पहिली दहा मिनिट लोक स्वस्थ होते. मग चुळबुळ सुरू झाली प्रवाशांची. डब्यात जरा हाय फाय पुणेकरांचा भरणा. त्यामुळे नक्की काय झालय ते करायला वेळ

लागला. ओव्हर हेड वायर तुटली आहे, आणि गाडी आता तासभर इथेच थांबेल असे कळले. आम्ही अस्वस्थच होतो.

तेवढ्यात मागून आवाज आला, काय कविवर्य आहात कुठे? बरे भेटलात. हा आवाज होता, सुधीर गाडगीळ यांचा. आणि आमच्या एक सीट सोडून पुढे होते, वसंत बापट.

मग काय त्यांच्या साहित्य, कविता वाचन, ह्या वरच्या गप्पा ऐकत लोणावळा कधी आल कळलच नाही. लोणावळयाला गाडगीळ त्यांच्या डब्यात परत गेले. कारण ते शिवाजी नगरला उतरणार होते.

पुण्यात आम्ही उतरलो तर परिचित सनईचे सूर कानावर पडले. तेव्हा एक वाजला होता. वसंत बापट कवी, परत वयाने जेष्ठ, तेव्हा त्यांना रिक्षा आधी घेऊ द्यावा अस मला वेडीला वाटल.

पण रिक्षावाला खट. आमच अंतर जास्त लांबच होत ना? मग काय? रिक्षात बसल्यावर त्याला म्हटल, तू हे बरोबर केल नाहीस.

तर म्हणतो "अहो म्हातारा खट आहे, रातच्याला दीडपट भाग द्यायला कटकट करतो."

"तुम्ही बाहेरचे, तुम्ही द्याल"

असो.

पण "दख्खन ची राणी" कविता लिहिणार्या कवी बरोबरचा हा सहप्रवास लांबला, पण आठवणीत मात्र राहीला.  गाडगीळांचेही आभार. त्यांच्या मुळेच गप्पा रंगल्या.

# १६. प्रवासातील सुखद अनुभव - ३ - यशवंत देव

आम्ही मुलीच्या लग्नाचे रिसेप्शन आटपून मुंबई ला येण्यासाठी म्हणून "भोपाळ" स्टेशनवर आलो. आता लेकीला सोडून निघायच, म्हणजे मनाची विमनस्क अवस्था होती. धाकटी मुलगी तर रडू कसबस आवरून होती. आम्ही डब्यात शिरलो, गाडी सुरू झाली. आणि तिचा संयम सुटला. ती हुंदके देऊन रडू लागली  बाजूच जोडप काय झाल हिला, विचारू लागल.

आवाज अगदी गोड, आणि खूप ओळखीचा. क्षणात बाजूला लक्ष गेले तर "साक्षात देव", यशवंत देव.  मग मी मुलीला म्हटल, अग बघ, कोण आहेत आपले सहप्रवासी.

तुला मी म्हणते ती गाणी आवडतात ना, त्या गाण्यांचे कवी, व संगीतकार.देव सर.



मग काय, गप्पा रंगल्या. कारण गाण हा समान धागा. त्या क्षेत्रातले काही ओळखीचे लोक.

निलमताईंना म्हटल, सर दूरदर्शनवर तरी दिसतात, आम्ही ऐकतो त्यांचा आवाज. पण तुमच्या रेडिओ वरील निवृत्तीनंतर तुमचा आवाज आज प्रत्यक्ष ऐकायला मिळाला. इतक्या गोड हसल्या, अगदी रेडिओवर हसत तशाच.

मग देव सर म्हणाले, आमचा दोघांचा असा फोटो नाही. तुमच्याकडे कॅमेरा दिसतो. काढाल का एक फोटो.  मग ह्यांनी त्या दोघांचा फोटो, काढला. परत आल्यावर ते रीळ डेव्हलप करून मी तो फोटो पोस्ट केला.

अजून डिजिटल चा जमाना आला नव्हता. आता हे लिहितानाही गंमत वाटते. विज्ञान किती झपाट्याने पुढे जात आहे. पण अशा आठवणी मात्र बरोबर रहातात.

त्यानंतर एक, दोन कार्यक्रमाच्या निमित्ताने देव सर भेटले. हसून, काय परत भोपाळची ट्रिप झाली की नाही? धाकटी मुलगी काय म्हणते, हे विचारायला विसरले नाहीत.

# १७. गंमत जंमत (अजून एक किस्सा) नापासाची गंमत

आज आठवण झाली तरी कुठल्या पुरातन काळात गेल्यासारखं वाटतं. तेव्हा एसएससी बोर्ड, एच्एससी बोर्ड, "पदवी परीक्षा" यांचे "निकाल" पेपर मध्ये छापून येत असत. परीक्षे प्रमाणेच "निकाल" ठरल्या तारखेला जाहीर होत असे.

खरे पाहता मी आर्ट्स म्हणजे "कला" शाखेची विद्यार्थिनी. इंटरच्या निकालानंतर माझ्या शैक्षणिक विश्वात असा फार काय बदल होणार होता? फक्त विषय कोणते घ्यायचे हे ठरणार येवढच. तरी इंटर म्हटलं की "धडधड" असतेच. कित्येकांची "दांडी गुल" होत असे त्या काळी इंटरला.

माझाही रिझल्ट दोन दिवसांवर आला असताना बाबा म्हणाले "तुझा नंबर देऊन ठेव. बघू आधी कळला तर रिझल्ट" "एक प्रेस वाले आहेत ओळखीचे". झाल तो दिवस तसाच गेला.

रिझल्ट च्या आदल्या दिवशी दुपारी बाबांचा फोन आला "तुला पहिला वर्ग मिळाला आहे"

मग काय खूपच आनंदाचं वातावरण होतं. रात्री बाबा घरी आल्यावर म्हणाले "उद्या पेढे न्यायला हवे मला ऑफिसमध्ये"

सकाळ झाली. माझी मोठी बहीण म्हणाली मी स्टेशनवर जाऊन लवकर पेपर घेऊन येते. तेव्हा सकाळचे साडेपाच वाजत होते. आपला नंबर पेपर मध्ये बघेपर्यंत खात्री होत नसे पास झाल्याची. एवढी वृत्तपत्राची विश्वासार्हता होती.

घरी येत असे "महाराष्ट्र टाइम्स". अधिक कौतुक वाचायला मिळावे म्हणून ती लोकसत्ता घेऊन आली.

निकालाचे पान उघडले तर काय? माझा नंबर नाही. फर्स्ट क्लास मध्ये कोणीच नाही. तेव्हा मला आश्चर्यही वाटलं नाही. कारण आर्टस् ला "हायर सेकंड क्लास" मिळणं हीच मुश्कील होती त्या काळात. आतासारखं मार्कांचं वाटप नव्हतं ना. सगळे चक्रावले.

बाबा तर एकदम गंभीर झाले, म्हणाले "आता या खुर्चीवर बसून राहा. कुठे इकडे तिकडे करू नको गॅलरीत वगैरे. सगळे विचारतील तुला रिझल्ट रिझल्ट म्हणून". त्याकाळी असं नापास होणं म्हणजे मोठा गुन्हा होता. लक्ष नाही अभ्यासात वगैरे वगैरे......

झालं. बाबा अंघोळीला गेल्यावर मी उठून बाहेरच्या खुर्चीत जाऊन बसले. फर्स्ट क्लास नाही, तरी नापास कशी होणार मी हेच मला कळेना. लक्ष दाराकडेच होते.

ठरल्या वेळेला महाराष्ट्र टाईम्स आला. निकालाचे पान उघडले तर पहिला वर्ग या खाली फक्त माझा नंबर होता. आणि वरती दोन ओळी की "ह्या" मुलीने पहिला वर्ग मिळवला असून तिला पहिल्या क्रमांकाचा मान मिळाला आहे.

मग काय दाखवलं ते बहिणीला. आनंदाने ओरडलीच ती.

आई-बाबा बाहेर आले आणि मग डोळयात पाणी आलं ते आनंदाचं की आधीच्या प्रकारामुळे झालेल्या दुःखाचं तेच कळेना. तेव्हापासूनच मला दोन तासासाठी का होईना, मला नापास म्हणून ठरवणाऱ्या त्या लोकसत्ता वर माझा जरा राग आहे, जरी कोणी "यक्ष" "कुबेर" त्याकाळी तिथे नव्हते तरीही.

# १८. सांग दर्पणा

माणसाने जे अनेक शोध लावले, त्यातील पुरातन आणि स्त्रीच्या विश्वात ज्याला मानाच स्थान आहे, असा हा शोध.

कांच आणि पारा यांच्या वापराने बनवलेली एक वस्तू. अगदी लहान वयापासून आपली याच्याशी सलगी असते. बाहेर पडायचे म्हटल, की आरशात न बघता बाहेर पडणारी व्यक्ती विरळाच. तारुण्यात या आरशाची असणारी सलगी अधिकच वाढते.



"अग किती वेळ आरशापुढे?" नीघ आता. किंवा "काय हे सारख आरशापुढे उभ रहाण? चांगल नाही, वगैरे खूप एकून घ्याव लागत ह्या पायी.

आणखी थोड मोठ झाल, म्हणजे संसाराची जबाबदारी अंगावर आली की, धावपळ सुरू होते, आरशासमोर उभ रहायला वेळच मिळत नाही. ऑफिसची वेळ गाठायच्या

गडबडीत टिकली नीट लागली आहेना, जागेवर? एवढच बघायला वेळ मिळतो. संसाराच्या जबाबदाऱ्या, रामरगाडा, मुल त्यांच करीअर, अभ्यास एक ना दोन.

त्यातच संसारात दुसर चाक, बरोबरीत धावणार नसेल तर काय दमछाक होते, ते एक बाईच जाणे.! स्त्री ला मुळातच सहनशक्तीचा देणगी लाभली आहे. त्या मुळे ही तारेवरची कसरत तीला जमते. आणि हे सर्व तिच्या चेहऱ्यावर दिसू लागते.

म्हणजे "सांग दर्पणा कशी मी दिसते" अस आरशाला विचारणाऱ्या तिचा चेहरा च आरसा बनून जातो.

एरवी सुद्धा माणसाचा चेहरा पाहून आपण आडाखे बांधतोच की.

"ह्या समोर रहायला आलेल्या बाई जरा शिष्ठ च वाटतात" असे आपले ग्रह आपण एका झटक्यात व्यक्त करतो. कोण मनापासून बोलतय, दाद देतय, तोंड देखील स्तुती करतो, हे आपल्याला लगेच माणसाच्या चेहऱ्यावरून कळत. म्हणजे आपलेच शब्द खोटे ठरवण्यात सामर्थ्य आपल्या चेहऱ्यात आहे. प्रत्येकजण थोडाच कसलेला कलाकार असतो.?

आपल्या हातून एखादी चुकीची गोष्ट घडली, कोणाला लागेल असे जर आपण बोललो, मदत करू शकलो नाही तर तेही आपल्या चेहऱ्यावर लगेच दिसत.

म्हटलच आहे,

चित्ते प्रसन्ने भुवनं प्रसन्नम्

चित्ते विषण्णे भुवनं विषण्णम्

अताभिलाषो यदि ते सुखे स्यात्

चित्त प्रसादाय प्रथमं यतस्व|

म्हणून एखादी गोष्ट, कौतुक, हार, तुरे नाही, तर मनाला पटते म्हणून आपण करावी.

नवरा संध्याकाळी घरी आला की त्याच काहीतरी बिनसल आहे, हे पत्नीला, त्याचा चेहरा पाहून कळत, किंवा "आज बाईसाहेब खुश नाहीत हे नवऱ्याला.

"शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलिकडले"

आम्ही नर्मदा परिक्रमेला निघालो, तेव्हा ओंकारेश्वरी मला एक गृहस्थ दिसले.अनवाणी, हातात काठी, उपरण. मी त्यांना विचारणार हात करून, की तुम्ही परिक्रमा वासी का? त्या आधीच ते हसले, व हात वर केला. माझ्या चेहऱ्यावरूनच त्यांना प्रश्न

कळला जणू.  फक्त जेवून उठले, तेव्हा जाताना, "एक काठी जवळ ठेवा"असे सांगून गेले.

हिंदीत एक गाण आहे,

तोरा मन दर्पण कहलाये रे

तुझा चेहराच चांगल्या,वाईट कृत्यांचा आरसा आहे, त्यावर धूळ जमता कामा नये. ही धूळ कुठली तर कुविचारांची. जगापासून आपण बतावणी करून पळ काढू पण मन ते विसरत नाही खरी गोष्ट. सात्विक चेहऱ्याचा गुंड, आणि उग्र चेहऱ्याचा संत आपण पाहीला आहे का कधी?

रामदास म्हणतात, "अचपळ मन माझे नावरे आवरिता" जगापासून दूर पळणे सोपे, पण वार्या पेक्षा वेगाने धावणारे मन? आपल्या एकटेपणात ते गैर कृत्यांची टोचणी देणारच.

तेव्हा हा आरसा जेवढा लखलखीत ठेवता येईल तेवढा ठेवू.

# १९. अलक

१. दुसरा कोव्हिड डोसा घ्यायला **“ही”** सेंटरला पोचली. पहिल्यासारखीच मोठी लाईन पण व्यवस्थाही चोख. तिचा नंबर आला व्हॅक्सिन घेतल्यावर तिने त्या मुलीला एक कॅडबरी दिले. कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणखी सोपा मार्ग तिला दिसला नाही.

२. नवरा परदेशी असताना सासु चे ऑपरेशन पार पाडण्याची वेळ "तिच्यावर" आली. डॉक्टर परिचित. त्या छोट्या रुग्णालयात स्पेशल रूम नव्हती शिल्लक. पण डॉक्टरांनी सासूच्या खोलीतला दुसरा बेड फक्त पुनर्तपासणी च्या पेशंटला वापरून "तिची" सोय पाहिली. जाणीव ठेवण्यापेक्षा आणखी मोठे काय असते?

३. दार्जिलिंगला पोहोचेपर्यंत अंधार दाटून आला. एकाएकी विजा चमकू लागल्या. आणि जोराचा पाऊस सुरू झाला. रस्त्यावर गुडुप अंधार, मनात भीती आणि पोटात गोळा. पण बसच्या एका दिव्याच्या उजेडात ड्रायव्हरने सुखरूप दार्जिलिंगला पोहोचवले. चांगला सारथी काय फक्त

अर्जुनाचा का? असे अनेक सारथी वाटेत भेटतात हो की नाही?

४. नणंदेचे लग्न लांबू नये म्हणून त्यांनी एकत्र कुटुंबातच राहून आपले नवे घर एक वर्ष राहायला दिले.आपल्यापरीने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. तीन वर्षांनी किल्ली परत देताना, "मी एकही दिवस इथे सुखाने घास खाल्ला नाही" असे शब्द ऐकून २९ व्या वर्षी "मीनाला" कोणीतरी तोंडात मारल्यासरखे वाटले.

# २०. **लागा चुनरीमें दाग**

**"नववधू प्रिया मी बावरते"** ही भा. रा. तांबे ह्यांची कविता, त्याचं लता मंगेशकर च्या आवाजात गाण रेकॉर्ड झाल आणि ते तुफान लोकप्रिय झाल. त्याला कारण, शब्द, चाल आणि सूर ह्याचा अतिशय सुयोग्य संगम. प्रत्येक लग्नाच्या मांडवात हे गाण वाजवल जात असे. पण नंतर असे वाचनांत आले की ह्या गाण्यात गर्भित अर्थ दडलेला आहे.

कवि भा.रा. तांबे यांनी वार्धक्याच्या काळात ज्या काही रचना केल्या त्यापैंकीच ही एक. जन्मणारी व्यक्ती आणि मृत्यू ह्या मधे ते एक रूपक आहे. हे जेव्हा वाचनांत आल तेव्हा खूप आश्चर्य वाटल होत. त्या नंतर सुरेश भट, सुधीर मोघे, ह्यांच्याही अशा, दूर चाललेल्या प्रतिभेच्या संदर्भातील कवितांवर बद्दल वाचनांत आले.

असच एक हिंदी सिनेमातील गाण,

सिनेमा....दिल ही तो है

गीतकार.... साहीर लुधियानवी नाही.

संगीत कार.....रोशन

गायक.....मन्ना डे

सिनेमाची कथा खूप वेगळी होती अस नाही. पण सर्व गाणी एक से बढकर एक. त्यातली निगाहें मिलानेको, ही कव्वाल तर न विसरता येणारी.

त्यातलच एक गाण, "लागा चुनरीमे दाग".

खूप छान नाच आहे त्या गाण्यावर. नंतर चा तराणा, तबल्यावर "तोडे", खरच तोड नाही त्याला.

पण गाण परत, परत ऐकल की, शब्द परत परत वाचले की लक्षात येत की यांत वेगळा अर्थ दडलेला असावा.

कोरी चुनरिया, आत्मा मोरी, मैल है माया जाल.

वो दुनिया मोरे बाबुल का घर, ये दुनिया ससुराल|

कोरे बदन सी कोरी चुनरीया.

मी आले तेंव्हा माझे शरीर आणि आत्मा कोरे करकरीत होते. पण आता संसार तापा मुळे हे शरीर आणि आत्मा ह्या मोहमयी दुनियेत कलंकित झाल आहे, आता माहेरी (बाबुलके घर) कशी जाऊ?

भूल गयी सब वचन बीदाके

पाठवणी च्या वेळी दिलेल्या वचनांचा विसर पडला. आई जशी सासरी जाताना मुलीला चार समजुतीच्या गोष्टी सांगते, त्या मी विसरले.  ह्या संसारी रमून गेले. आता माहेरी परत तोंड कस दाखवू? बालपण, तारुण्य, वार्धक्य ह्या तीन पायऱ्या पार केल्या. सप्त रंग अनुभवले, पण माझ्या कृत्याचा जाब द्यावा लागेल, म्हणून मला परत जाताना भिती वाटते आहे.

केवढा खोल अर्थ आहे.

सुरवातीला उल्लेख केलेले" नववधू प्रिया" हे गाणे. त्यात हा संसार, जग, हे माहेर आणि मृत्यूनंतर चे जग म्हणजे सासर असे वर्णन आहे. नववधूच्या मनातले भाव, आणि वृद्ध व्यक्तिच्या मनाची मृत्यूच्या विचाराने होणारी घालमेल, भावनांचा कल्लोळ ह्यांची सुरेख सांगड घातली आहे.

आता तूच भयलाज हरी रे,

धीर देऊन ने नवरी रे

आता हे देवा तूच मला आधार देऊन घेऊन जा अशी परमेश्वराला कवि विनवतो आहे. दोन कवीमनाच्या, वेगवेगळ्या व्यक्ति. हा "संसार" आणि "मृत्यू" वा त्या नंतरच जग यांची दोन वेगळ्या प्रकारे सांगड घातली आहे.

खरच न देखे रवी, ते देखे कवि. अस म्हणतात ते उगाच नाही.

जिवलगा राहिले रे दूर घर माझे ही एक विराणी.

आर्त सूर, सुंदर स्वर रचना. पण त्यातही काही रूपक आहे का?

पण त्या बद्दल परत कधी तरी बोलू.

# २१. आई



बघता बघता आईला जाऊन वर्ष होत आलं. जवळच राहत असल्याने जिला दर आठवड्याला भेटण्याची सवय झाली होती ती आता दिसणार नव्हती. पण काळ आपल्याला अनेक गोष्टी शिकवतो. त्याचाच हा भाग.

पाच मुलं, सून, नातवंडं, नातसून, आणि पणतवंडं, अशा मोठ्या कुटुंबाच्या प्रमुख पदाची धुरा बाबा असताना पासूनच ती सांभाळत होती. ताई, माई मोठ्या आणि दादा लाडका मुलगा, (त्यानेही या उपाधीचा आब शेवटपर्यंत सांभाळला), वंदू साता समुद्रापार आणि मी? अहो तिचा ओरडा खायला, रागवायला हवं ना कुणीतरी? 😊

बाबा तर गंमतीने म्हणायचे आलीस का? आता थोडावेळ माझी सुटका. ह्यातला विनोदाचा भाग सोडला तर खरच तिने कधी आमच्यात फार भेदभाव केला नाही आणि आपण प्रेमाच्या माणसावर तर रागावतो. अशी समजूत मी करून घेतली. गेली तेव्हा सुद्धा स्वप्नात आली आणि रागावलीच माझ्यावर.

ती वाहत्या पाण्याचा प्रवाहा सारखी होती शेवाळ धरू न देणारी, पाण्यासारखी नाही समोरच्याचा रंग धारण करणारी. महाविद्यालयात ती गेली नाही पण संसाराच्या विश्वविद्यालयात असतील-नसतील त्या साऱ्या पदव्यांची ती मानकरी होती. व्यवस्थापन, सजावट, कलाकुसर, सौंदर्यदृष्टी, कशात कशात म्हणून कमी नाही. तिचे हलव्याचे दागिने आणि कागदाची केलेली फुलं म्हणजे चिकाटी आणि कल्पकता यांचा सुंदर नमुना होता. गाडीतून फिरण्याची तिला भारी आवड होती. ती ही पुरवली दादा आणि बाबांनी. एकदा कुठे जाऊन आली की रस्ते पाठ. साधे मॅप सुद्धा मिळणे मुश्कील होते तेव्हा, शिळफाटा, कर्जत, खोपोली सर्व लक्षात असे हिला. वहिनी गाडी चालवू लागली तेव्हा सुरुवातीला आईच तिच्यासोबत जात असे.

ती नऊवारीतून पाच वारीत कधी आली कळलंच नाही. परत सणवार, सोवळ्याचा स्वयंपाक असला की नऊवारी साडी नेसून तयार. “आता साडी अगदी नको वाटते”, पंजाबी ड्रेसची सवय झाली. असं म्हणणारी आताची तरुण पिढी पाहिली, की कौतुकच वाटतं तिचं.

घरात चातुर्मास, कुळधर्म, कुळाचार यात रमणारी ती. पार्टी आणि उदघाटन समारंभाला एवढेदा गेली असेल. पण तिथे जाताना

अगदी व्यवस्थित. जशी साहेबांची पत्नी असावी तशी. सुंदर, आब राखणारी साडी, मोजके दागिने, कुठे भपका नाही, की काकूबाई पणा नाही. सतत बदलत्या काळाशी जुळवून घेण्याची हातोटी तिच्यात होती. त्यामुळे नव्या प्रकारचे दागिने, खाण्यापिण्याचे पदार्थ, पर्यटन अशी आमचीही खूप हौस झाली.

फक्त तिने कौतुकाचे शब्द अधिक मोकळेपणाने वापरले असते तर "सोने पे सुहागाच."

नुसते आपण चांगले असून चालत नाही आजूबाजूची माणसं तशी मिळणं हे भाग्यच. ते भाग्य तिला लाभले. नव्याने आलेल्या नातसुना, नातजावई यांच्या नव्या रीतिंची तिने कधीही तक्रार केली नाही. एक परिपूर्ण जीवन ती जगली. खरंच, हेवा वाटावा. मधुमेह असूनही फार काळ अंथरूणावर पडून राहिली नाही ती. जेंव्हा आपण पूर्णच परावलंबी होतो आहे हे तिला जाणवले, तेंव्हा अगदी ठरवल्या सारखे तिनी स्वतःला देवाच्या स्वाधीन केले. आणखी भाग्य ते काय? वार्धक्या पर्यंत पोहोचलात तर कस रहायचं, हेही तिने कृतीने दाखवून दिले. वृद्धाश्रम वगैरे शब्द ती कधी तोंडातून काढत नसे, कंटाळा हा शब्द तिला माहीत नव्हता.

पण घरात असूनही आश्रमातल्या सारखं राहायची. **“सर्वात असूनही अलिप्त आणि अलिप्त असूनही सर्वात”** असायची.

म्हणूनच तिचं जाणं दीर्घकाळ तिच्या नसण्याची जाणीव देत राहील.

तिच्यामुळेच एवढे दिवस एका माळेत गुंफलेले राहीले हे मोती, पुढेही ही वीण अशीच जपण्याचा नक्कीच प्रयत्न करतील यात काय शंका ?

# २२.    तेथे कर माझे जुळती



माझ्या माहेरा प्रमाणे शिस्त, आणि तत्व निष्ठा जोपासणार माझ सासर होत.

माझे सासरे "डॉक्टर वि. द. टिळक" वनस्पति शास्त्रात डॉक्टरेट.

अतिशय कष्टाळू, स्वतः अर्थार्जन करून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले होते. अर्थात त्याकाळच्या इतर स्वबळावर मोठे होणार्या लोकांप्रमाणे त्यांच्याही स्वभावात आग्रहीपणा, निग्रह, आणि तत्व निष्ठा होती. अतिशय अल्प भौतिक गरजा होत्या त्यांच्या. वाचन, आणि संगीत हे दोन छंद त्यांनी कायम जोपासले. त्यांच्या शिस्त प्रिय स्वभावामुळेच मुलांचे उच्चशिक्षण आणि कुटुंबाचे भले झाले, ह्यात शंका नाही.

स्वतः विज्ञान शाखेचे पदव्युत्तर स्नातक, पण स्वभाव अतिशय हळवा. एवढा हळवा की, मुलीच्या लग्नात त्यांना कसे आवरावे हे न कळल्याने मुलीची पाठवणी तासभर लांबली.

गाण्याच्या मैफ़लींना जाणे ही त्यांची नुसती आवडच नव्हती, तर त्यात त्यांना चांगली गती होती. ऐच्छिक निवृत्तीनंतर त्यांनी

मुंबई विद्यापीठाचा संगीताचा पदविका अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला होता. "राग समय विचार"हे एक पुस्तक त्यांनी लिहीले होते. एका विशिष्ट वेळी विशिष्ट राग म्हटला जातो. त्याचा परिणाम, आणि व्याधींवर उपचारां साठी त्याचा काही उपयोग होईल का? हा विचार त्या पुस्तकात त्यांनी खूपच आधी मांडला होता.

"अष्टविनायक" यात्रा आणि "नर्मदा परिक्रमा" हे पायी चालत जाऊन पूर्ण केलेले उपक्रम म्हणजे त्यांच नियोजन, आणि जिद्द याचा वस्तुपाठच होता.

"पांचवा" , " सहावा" आयोग लागू होण्यापूर्वीच त्यांना मिळणार निवृत्तिवेतन त्यांना जास्त वाटे. आणि हे बरोबर आहे का? असा त्यांना प्रश्न पडे.

१९८८ साल असेल, माझी मुले आता स्थिर स्थावर झाली आहेत, मार्गी लागली आहेत, म्हणून त्यांनी औरंगाबादच घर कोणताही रोख व्यवहार न करता, चेकने पैसे घेऊन पूर्ण केला. (वरचे ब्लॅक मनी न घेता)

चांगल्या माणसांसाठी देव असतोच. त्या आधी त्यांच्या इच्छेप्रमाणे, सरकारी कोट्यातून त्यांना असच चेकने पैसे देऊन (कुठलाही रोख व्यवहार, ब्लॅकचे पैसे द्यावे न लागता) मुलुंडला घर मिळाले होते.

आज "खाऊंगा नही, खाने दूंगा नही" असे म्हणणारे पंतप्रधान आदर्श वाटतात.तसेच माझे सासरे मला तेव्हापासूनच आदर्श वाटत. हे सर्व घडल, कारण त्यांची तत्वनिष्ठाच.

तत्त्वनिष्ठ माणसांच्या कुटुंबाला थोडा त्रास सहन करावा लागतो, पण म्हणून गुण द्रुष्टिआड करता येत नाहीत. हं कधीतरी "अति सर्वत्र वर्जयेत्" असाव अस वाटत पण शेवटी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत नाही का?



ह्याला पूरक पण थोड सगळयाशी जुळवून घेणार, सासू बाईच व्यक्तिमत्व.

त्या कलाशाखेच्या पदवीधर आहेत.पण व्यवहारी. सासर्यांचा रागीट स्वभाव सांभाळून घेणाऱ्या. त्यांनाही गाण नसेल, पण लेखन, अभिनय यात गती होती.

कॉलनीत मंडळात, लहान, मोठ्या वयाच्या बायकांशी जुळवून घेऊन त्यांनी बरीच वर्ष काम केले. सभोवती समान आवड असणाऱ्यांचा गोतावळा त्यांना आवडतो.

मलाही त्यांनी माझी आवड जोपासण्यास प्रोत्साहन दिले आहे. विनोद करून वातावरणातील ताण कमी करण्याकडे त्यांचा कल असे. सासर आणि माहेर दोन्ही कडची नाती सांभाळून ठेवण्याचे कसब त्यांना साधले आहे.

पाठीच्या तीन शस्त्रक्रिया होऊनही, रोज नियमित व्यायाम करून नव्वदीतही, स्वतःची अन्हीके थोड्याशा मदतीने त्या करू शकतात. देवधर्म, पारायण ह्यात त्या रमतात. नव्याचे स्वागत, स्वीकारही सहजपणे करतात.

आता कोणी म्हणेल की हे प्रत्येकाला करावे लागते.  पण सगळ्यात मला वाटणारी मोठी, कौतुकास्पद गोष्ट म्हणजे आपल्या आई वेगळ्या पुतणीचा त्यांनी तिचे लग्न लावून देई पर्यंत केलेला सांभाळ. कोणालाही त्यांची मुलगी कोणती, पुतणी कोणती, ओळखू येत नसे. एवढी मुली सारखी, आपलेपणाची वागणूक असे. कळल लोकांना की आश्चर्य वाटत असे.

अर्थात कुटुंबातील इतर सदस्य, आणि त्यांचे भाऊ, बहीण हेही तेवढेच कौतुकाला पात्र आहेत. कुणीच तिला परक्या सारखी वागणूक दिली नाही.



पण ह्या सर्वांच्या मुळाशी सासूबाई आहेत हे विसरता येत नाही.

आमचेही पहिले घर घेताना, 78 साली आम्हालाही अगदी हव्या त्या ठिकाणी नाही, पण चेकने पैसे देवून घर घेता आले,

आणि मुलींच्या मेहनत, आणि हुशारीमुळे कोठलेही डोनेशन न देता, पी. एच् डी. (जॉन्स हॉपकिन्स, मेरीलॅन्ड) आणि एम् डी, (केइएम्) एफ् आर् सी ए. लंडन. असे उच्च शिक्षण त्यांनी पुरे केले.

या बदलत्या काळात देखील आपणही हा वारसा थोडाफार चालवू शकलो, हा आनंद आहे. ही सर्व, त्या दोघांची आणि परमेश्वराचीच कृपा.

म्हणूनच म्हणावेसे वाटते,



तेथे कर माझे जुळती.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्या-बरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तर आम्ही यापुढे जाऊन एक विनंती करू इच्छितो. आपले अनुभव लिहा. आपले आयुष्य शब्दांत मांडा.

लिहिणे जमत नसेल तर मोबाईलवर तुमच्या आवाजात रेकॉर्ड करा. तुमच्या आयुष्ताल्या घटना या येणाऱ्या पिढ्यांना दिपमार्ग ठरतील.

बाकी आमच्यावर सोपवा.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

लिहायलाही हवं!

www.esahity.com

esahity@gmail.com